# जिज्ञासापूर्ती

## भाग २



॥ श्रीगणेशदत्तरेणुकादेवी प्रसीदताम् ॥

# जिज्ञासापूर्ती

## भाग २

प. पू. दत्तमहाराज कवीश्वर
यांचेबरोबर झालेला
साधकांचा सुसंवाद

प्रकाशक
श्री दत्त आश्रम संस्थान


सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रकाशन दिवस
फाल्गुन शुद्ध १४
शके १९३०
सोमवार ९ मार्च २००९

मुखपृष्ठ
प्रभात एजन्सी

मुद्रक
रमा एन्टरप्रायजेस
१६, स्वामी समर्थ नगर,
३९, बंडू गोखले पथ, मुगभाट,
गिरगांव, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी २३८५ २८४६.
भ्रमणध्वनी ९००४६५८४६१

प्रकाशक
श्री दत्त आश्रम संस्थान
प. पू. श्री दत्त महाराज कवीश्वर मार्ग,
सद्गुरु नगर, प्रशांती नगर समोर.
जालना -४३१ २०३
दूरध्वनी ०२४८ २२३६८०५



प. पू. दत्तमहाराज कवीश्वर



प.पू. ताईमहाराज चाटुफळे

## ॥ श्री गणेशदत्त गुरूभ्योनम: ॥

# '' *जिज्ञासापूर्तीच्या निमित्ताने* ''

एकदा एका साधकाने प. पू. श्रीगोंदवलेकर महाराजांना विचारले की, शिष्य आणि विद्यार्थी यात काय फरक आहे. त्यावर महाराज म्हणाले, दृश्याची विद्या घेणारा विद्यार्थी आणि अदृश्याची विद्या घेणारा तो शिष्य. जिज्ञासू हा शिष्यासारखा असतो. जिज्ञासा म्हणजे ज्ञानाची इच्छा, कुतुहल,शोधक बुद्धी. ही ज्याच्याजवळ आहे तो जिज्ञासू. विद्यार्थी आणि शिष्य यात जो फरक आहे तोच फरक शंका, विकल्प आणि जिज्ञासा यात आहे. अती शंका, विकल्प आपल्याला चिकित्सेकडे घेऊन जातात तर जाणतेपणे समजून घेणं बुद्धी स्थिरतेकडे! ह्या पुस्तकातील साधकवृत्तीचे प्रश्न आणि सिद्धावस्थेतली उत्तर बुद्धीस्थिरतेकडेच नेणारी आहेत.

साधक हा प्रापंचिक असला तरी आपल्याला जे साधायचं आहे ते काही वेगळंच आहे, याची जाणीव त्यास असते. त्याविषयीची 'जाण ' मात्र सद्गुरु प्राप्त करुन देतात. आत्मवस्तूच्या ठिकाणी आपली बुद्धी नेहमी स्थिर असणं म्हणजे 'समाधान' असं आचार्यमहाराजांनी सांगितलं आहे. तथापि, गृहस्थाश्रमात लौकीक व्यवहाराला साधकाला अधिक सामोरे जावे लागते. प्रपंच व परमार्थ दोन्ही साधताना जीव मेटाकुटीस येतो. यातूनच अनेक प्रश्न मनात उभे राहतात. तो जीव सद्गुरुचरणांपाशी येतो. सद्गुरु त्यांच्या मनाचे समाधान करतात. प्रपंच न सोडता, त्याकडे दुर्लक्ष न करता परम अर्थाकडे जाता येतं, साधनामार्ग अनुसरता येतो, नामाचं अनुसंधान राखता येतं हे श्रीदत्तमहाराजांनी खूप प्रेमानं आणि आशीर्वादात्मक पद्धतीनं सांगितलं आहे.

आपण 'मी कर्ता' या भूमिकेतूनच प्रपंच करीत असतो. श्रीमहाराज सांगतात, ''मी एक नोकर आहे. माझा संसार आहे म्हणणे चुकीचे. देवाचा संसार आहे, म्हणून करतो, भरताप्रमाणे संसार करायचा, दुर्योधनाप्रमाणे नाही.'' त्यांच्या शब्दाचं अनुसरण घडलं तर प्रपंचाच्या 'मातीच्या भिंती' लक्षात यायला वेळ लागत नाही.बुद्धीचीही स्थिरता होत जाते. कारण सद्गुरु शब्दातून शक्तीपातच करीत असतात.समर्थ रामदासांनी 'आपण कोण व देव कोण' या दोनच गोष्टी सद्गुरुंना विचाराव्यात असं म्हटलं आहे. 'आपण कोण' मध्ये जगत नावाचा प्रपंच येतो. एकदा का त्याची उकल झाली की परमार्थाची वाटचाल हळूहळू सुरु होते. राम कर्ता आहे, ईश्वरी शक्तीच्या बळावर सर्व चाललं आहे. ही जाणीव सद्गुरुंच्या सांगण्याने स्पष्ट झाली की जीव देहातील देवाकडे म्हणजे आत्मारामाकडे वळतो. ध्येय निश्चित व्हायला सुरवात होते व जीवाचा खरा प्रवास सुरु होतो. या वाटचालीत सद्गुरु आपले वाटाडे असतात. अनेक प्रश्न मनात असतात. माझ्यातले दोष कमी कसे होतील, अनुसंधान कसं राहील, ईश्वराची कृपा कशामुळे होईल, व्यवहार करताना जप, साधना कशी करावी, व्यावहारिक उन्नती महत्त्वाची आहे का नाही, साधनेत प्रगती होत आहे का नाही, हे सर्व मनात साचलेलं असतं. एक प्रकारे गुरु-शिष्य संबंधातील ही पारमार्थिक, प्रापंचिक, व्यावहारिक विचारांची देवाण-घेवाणच असते, जी जीवाला उत्तम व्यवहार, नेटका प्रपंच, सकस परमार्थ करायला शिकवते.

श्री महाराजांच्या मनामध्ये प्रत्येक जीवाविषयी आपलेपणा, प्रेम, उद्धाराची तळमळ होती. मानवजन्म मिळाला आहे, तेव्हा प्रत्येकानं आपलं कल्याण साधून घ्यावं ही कळकळ होती.

श्रीमहाराजांची उत्तर साधकाला साधनमार्गाला जखडून ठेवणारी आहेत. 'सूत गुंतले ते उकलावे । तैसे मन उगवावे ' रेशमी गुंता हळूवारपणे सोडवावा तसे श्री महाराजांचे शब्द मनाचं समाधान करतात. '' मनातील ईश्वरभाव वाढला की दोष जातात आणि गुण येतात असं सांगून गुणांचं संवर्धन करावं हे सुचवितात तर अनुसंधानासाठी देवाची प्रार्थना करावी 'तुम्हीच करवून घ्या' म्हणून सांगावे. त्याच्या कृपेने शांती मिळते, असा विश्वास देतात. मनातले विकार, दोष कमी होणं ही साधनेतील प्रगती आहे, असे अत्यंत वर्माचे वचन बोलतात. '' श्री महाराजांनी साधकाशी आत्मसंवाद साधला आहे. याप्रमाणे साधक घडला की सद्गुरुंना खरा आनंद होत असतो. परमार्थ हा आकाशासारखा व्यापक आणि समुद्रासारखा खोल झाला पाहिजे, यावर श्री महाराजांचा निश्चितच भर होता. ''आत्मा हा सर्वव्यापक आहे पण त्या ठिकाणी बुद्धी स्थिर होईपर्यंत निरनिराळ्या देवतांची उपासना करावी लागते. आत्म्याचे चिंतन करायला त्या देवतांचा उपयोग होतो, हे श्री महाराज सांगतात. त्या साठी मार्मिक दाखला देतात की, ''लहान मुलाने विचारले चंद्र कोणचा आहे? ती झाडाची फांदी नाही का तो चंद्र आहे. म्हणजे इकडे तिकडे न पाहता त्या झाडाच्या फांदीपर्यंत तरी दृष्टी जाईल त्याच्यापुढे चंद्र आहे. फांदीवर चंद्र आहे असे नाही. पण हे समजण्याकरता तसे सांगणे आहे. त्या करता हे सगळे उपाय आहेत.''

परमार्थ विषयी हे विवेचन करताना श्रीमहाराजांना साधकाच्या व्यावहारिक अडचणींची जाणीव होती. व्यावहारिक उन्नती व साधनजप याची सांगड कशी घालायची याचे दिलेले उत्तर अतिशय मननीय आहे. ते म्हणतात, व्यवहार सोडून चालत नाही. आपल्या मनाचा कल कुठं आहे ते बघून ठरवायचं. व्यवहार सोडून परमार्थ

करीत बसलो आणि उद्या इतरांची भरभराट पाहिल्यावर जर आपल्या मनात आलं की आपण सुद्धा आपली व्यावहारिक उन्नती साधली असती तर कीती बरं झालं असतं. असे जर का आपले मन उद्या बदलले तर? नुसती साधना करण्याचे आमचे प्रारब्ध आहे का? बाकीची सगळी व्यवस्था एकदा लागली की मग साधनेला हवा तेवढा वेळ देता येईल. योग्य अर्थार्जन केल्यावर त्या द्रव्याचा पुण्यकर्म करण्याकरीता विनियोग करता येतो '' हे सांगताना मानवजन्माचे मूळ ध्येय आत्मस्वरुपापर्यंत जाण्याचं आहे, हे सूत्र अबाधितच राहते. तळमळ पाहिजे, त्यानंतर प्रारब्ध सहन करण्याची शक्ती पाहिजे आणि सर्वत्र ईश्वरभावाचा अभ्यास केला पाहिजे तरच ईश्वरकृपा होते, हे निर्वाणीचं सांगतातच.

श्रीमहाराज कुठल्याही भूमिकेतून बोलत नसत. भूमिकेचा अडसर त्यांना नव्हता. ते समदर्शी होते. अनवरत कृपादृष्टीने वर्षत होते. कधी शब्दांच्या माध्यमातून , कधी केवळ दृष्टीतून, केवळ संकल्पमात्र.... शेतात आणि खडकावरही. 'सर्वही भूतांचे हृदय । नाम त्याचे रामराय' या दृष्टीतून घडलेले हे मार्गदर्शन आहे. भक्त प्रल्हादाच्या कथेत श्रीमहाराजांनी एक सिद्धांत मांडला आहे की, बिंबाच्या गळ्यात माळ असेल तरच ती प्रतिबिंबाला मिळेल. श्रीमहाराज हे 'तत्व-ज्ञ ' होते. म्हणजे तत्त्वाला, आत्मवस्तूला जाणणारे आणि अनुभवणारे होते. त्यामुळे त्यांचा प्रत्येक शब्द 'ब्रह्मज्ञानी महात्म्याचा ' शब्द आहे. तो आपण अतीव श्रद्धेने, प्रयत्नपूर्वक अंत:करणात धारण केला तर 'आत्महित' साधेल, यात शंका नाही. हाच श्रीमहाराजांच्या मार्गदर्शनाचा हेतू आहे., जो या जिज्ञासापूर्तीच्या माध्यमातून प्रकट झाला आहे.

**********

१. शक्तीपात दीक्षा देऊन सद्‌गुरु कोणती शक्ती दीक्षित व्यक्तीत संक्रमित करतात?

श्री– 'एकोहं बहुस्यामि' अशा संकल्प शक्तीने हे विश्व निर्माण होते तीच संकल्पशक्ती दीक्षा देतांना तुम्हांला दिली जाते. ज्याप्रमाणे विश्व निर्माण होतांना निर्मितीमुळे ती शक्ती कांही कमी होत नाही त्याचप्रमाणे दीक्षा देणाऱ्याची शक्ती कमी होत नाही.

२. रोज संध्याकाळी लोकलमधून घरी येताना गाडीत बसल्याबरोबर माझे डोळे मिटतात व माझे उतरण्याचे स्टेशन येण्याच्या आधी डोळे उघडतात असे कां व्हावे?

श्री– छान आहे. ही पण ईश्वराची कृपाच आहे. शक्ती, तिला जेव्हां तिचे कार्य करायचे असते तेव्हांच करते. अशा वेळी जागेचा प्रश्न येत नाही.

३. शरीरात ६ चक्र असतात त्यांच्याबद्दल कांही सांगता कां?

श्री– ती चक्रं --- त्या त्या स्थानामध्ये त्याची ती सगळी दलं, त्या दलामध्ये असलेली मातृका म्हणजे सगळी वर्णाक्षरं आणि त्यांच्या पुन्हा देवता. इतक्यांचा निवास शरीरामध्ये आहे. असं हे शास्त्रं सांगतं. त्या त्या ठिकाणी भावना करुन, हृदयामध्ये आहे, मूलाधारामध्ये आहे, नाभीस्थानामध्ये आहे, कंठामध्ये आहे, भ्रूचक्रामध्ये आहे अशी स्थानं म्हणजे शब्दांनीच फक्त आपण त्यांच्याबद्दल ऐकलेले किंवा वाचलेले असते. त्या शब्दांनी जेवढी कल्पना करता येईल तेवढी करुन त्याचे जर ध्यान सुरु केले तर त्या त्या देवतांचे, त्या त्या चक्राचे दर्शन होऊ शकते.

त्याला फार काळ जातो. चित्ताची फार एकाग्रता व्हावी लागते.

४. आपल्या शक्तीपात विद्येचा आणि या चक्रांच्या उपासनेचा कितपत संबंध येतो?

श्री– त्याचा संबंध म्हणजे त्याचा एवढा विचार करता येतो.

५. ते इस्लामपूरचे वैद्य नांवाचे जे गृहस्थ होते त्यांनी इतर पुस्तकांबरोबरच षट्चक्र दर्शन म्हणून एक पुस्तक लिहिलेले आहे. त्याच्यामध्ये हे सगळं वर्णन केलेले आहे. पण या माहितीचा साधनेच्या दृष्टीने प्रत्यक्ष उपयोग कसा करुन घ्यायचा हे त्या पुस्तकांत कुठेच सांगितलेले नाही. चक्राची सविस्तर माहीती दिली आहे – त्या चक्राची देवता, बीजे इ. पण त्या चक्रदेवतेची उपासना नेमकी कशी करावी याचा कांहीच उल्लेख नाही.

श्री– भक्तीमार्गामध्ये त्या त्या देवतेची उपासना आपण इतर वेळी करु शकतो. ज्या गुरुंनी आपल्याला दीक्षा दिली असेल त्यांच्यावर विश्वास ठेवून स्वस्थ राहाणे हा एक अभ्यास आहे आणि आता त्या त्या देवतांच्या उपासनेची माहिती समजल्यानंतर आपल्याला जर करता आली तर त्यांची उपासना करायची. त्या देवतेचे ध्यान करण्याचा प्रयत्न करायचा, त्या त्या स्थानामध्ये चित्तं एकाग्र करुन. तो स्वतंत्र भाग झाला. बैठकीमध्ये आपोआप कांहीही होऊ शकतं. आपल्याला हे शब्दं प्रमाणाने समजलेले आहे त्या प्रमाणे करायचे. म्हणजे इतर विचार तरी मनांत येत नाही. बैठकीच्या वेळी इतर विचार मनांत न येणे हे बरे आहे.

इतर विचार-मनांत येतात. मग इतर वेळेला हा जर विचार (चक्रांचा) मनांत केला तर योग्यच आहे की ! ह्या विचारांना प्रत्यक्ष ते स्वरुप येण्यास काळ लागणार ना. तो अभ्यास थोडा थोडा होणार की नाही. चित्ताच्या बाकीच्या विषयांशी संबंध सुटला तरी पुष्कळ आहे. शास्त्राने शरीरामध्येच इतक्या देवतांचा संबंध ठरविला आहे. देवता आणखी पुष्कळ व्यापक आहेत. पण त्यांचा संबंध इथेही असू शकतो. तो कसा असेल काय असेल हे कांही आपण पाहू शकत नाही. पण त्या त्या देवतांची अदृष्य शक्ती आहे. राष्ट्रपतींचा संबंध सगळीकडे आहे एक शक्ती म्हणून. व्यक्ती निराळी. पण राष्ट्रपती म्हणून एक शक्ती मानली गेलेली आहे. त्याचा संबंध सर्वांशी आहे. संपूर्ण राष्ट्रामध्ये काम करणारे नोकर वर्ग, नियम्य जेवढे आहेत त्या सर्वांशी राष्ट्रपतींचा संबंध आहे. राष्ट्रपतींची शक्ती काय आहे हे आपल्याला प्रत्यक्ष दिसत नाही पण ती आहे. ती कार्यावरुन समजून येते. त्यांचा हुकूम जारी झाला. ती संबंध विधानसभा बरखास्त झाली हे सगळं कार्य होतं ना ! त्यामुळे शक्ती आहे. त्या शक्तीचे प्रतीक म्हणून ती व्यक्ती (राष्ट्रपती) आहे. तशाच सगळ्या या देवतांच्या शक्ती शरीरामध्ये आहेत. जीवात्मा एक आहेच. त्याला शरीरामध्ये ही साधनं म्हणून आहेत. त्या साधनांशीसुद्धा त्याचा संबंध आहे. त्या देवतांची उपासना करण्यात फायदा आहे.

६. पण महाराज आत्मा हाच आपल्याला धरायचाय, त्याची सद्गुरु मानून उपासना केली तर एवढ्या सगळ्या देवतांची

उपासना करायचे कष्ट नकोत ना करायला ! राष्ट्रपतींसारखाच आत्मा आहे ना !

श्री- आत्मा सर्व व्यापक आहे पण त्या ठिकाणी बुद्धी स्थिर होईपर्यंत ही उपासना केली पाहिजे ना ! केवळ त्याचे चिंतन जर करता आले तर ह्या सगळ्या देवता त्याला सहाय्यीभूत होतात. ही इंद्रिये स्वाधीन होणे हे सुद्धा काम मोठे आहे. सगळी कर्मेंद्रिये, ज्ञानेंद्रिये आणि त्यांचे नियामक म्हणून मन हे सगळे ताब्यामध्ये येण्याकरता त्या देवतांचा उपयोग होतो. राष्ट्रपतींपर्यंत पोचण्यास मधल्या अधिकाऱ्यांमार्फत जावे लागेल की नाही.

७. सद्गुरुंची शक्ती पाठीशी असल्यावर इतक्या सगळ्यांच्या मार्फत जावे लागणार नाही ना?

श्री- परंतु ज्या देवता आहेत, त्यांचे ज्ञान झाले उपासना झाली तर काय बिघडले? त्याही जीवच आहेत.

८. बिघडंत कांहीच नाही. आम्ही एक सद्गुरु धरतो.

श्री- त्या देवता म्हणजेसुद्धा जीवात्माच आहेत. त्यांच्या अधिकाराप्रमाणे सृष्टीतली ती स्थाने मिळालेली आहेत. कलेक्टर होतो, राष्ट्रपती होतो. ते सुद्धा अधिकार मिळविंलेले जीवात्मेच आहेत. व्यक्तीच आहेत. तसं धरणं हे चांगलंच आहे. पण जरुर नाही असेही म्हणायचे नाही. कोणाला जिज्ञासेने जर त्यांची उपासना करायची असेल तर ते शक्य आहे. आणि सद्गुरुंच्या प्रसादानेही ते शक्यं आहे. त्या त्या देवतेचे ध्यान करायला पुष्कळ वेळ लागेल. पण उपयोग असा होईल की मन संसारातल्या विचारांपासून

बाजूला होऊन त्या वेळेपुरते तरी त्या विचारांमध्ये राहील. नुसते मन आवरतो म्हणजे काय? त्या मनाला दुसरा कांही तरी विषय द्यायला पाहिजे की नको? हा विषय दिला की झालं. जी पूर्ण शक्ती आहे त्या पूर्ण शक्तीने केवढे कार्य केलेले आहे हे समजून घेण्यासारखे आहे. जगाचा विचार याकरताच करायचा आहे. जीवात्मा कोण आहे, त्याचा नियामक कोण आहे, हा सगळा मुख्य विचार आहे. अचेतन जग म्हणून काय आहे? कोणी निर्माण केले? म्हणजे त्या ईश्वराच्या विषयी एक भावना जास्ती दृढ व्हायला त्याचा उपयोग होतो. शेवटी तो विसरुन जायचा आहे. अध्यारोपापवाद म्हणतातच. सगळं एकदा फळ्यावर लिहून दाखवितात, गणित किंवा काय विषय असेल तो आणि पुन्हा तो पुसून टाकतात. ध्यानांत येण्याकरता तो आहे. सृष्टीचा विचार त्या पूर्ण शक्तीचे ज्ञान करुन घेण्याकरताच मांडलेला आहे शास्त्रकारांनी. तो प्रमुख, मुख्य विचार नाही.

लहान मुलाने विचारले चंद्र कोणचा आहे? ती झाडाची फांदी नाही का तो चंद्र आहे. म्हणजे इकडे तिकडे न पहाता त्या झाडाच्या फांदीपर्यंत तरी दृष्टी जाईल. त्याच्यापुढे चंद्र आहे. फांदीवर चंद्र आहे असे नाही. पण हे समजण्याकरता तसे सांगणे आहे. त्याकरता हे सगळे उपाय आहेत.

९ शक्तीपात दीक्षा घेतलेल्या साधकाला हा सगळा स्वतंत्र अभ्यास करण्याची आवश्यकता आहे कां?

श्री– जिज्ञासा असली तर काय हरकत आहे? सद्‌गुरुंच्या कृपेने जी पूर्ण ईश्वरशक्ती आहे तिच्या कृपेने हे सगळे होऊ शकते. समजू शकते. तितिक्षा. म्हणजे प्रत्यक्ष हे होऊ शकते. धारणा, ध्यान, समाधी ही तीन महत्त्वाची अंगं सांगितली आहेत. ती जर बरोबर एका विषयाशी जमली म्हणजे तितकं मन जर स्थिर झाले तर त्या पदार्थाचे सगळे गुण समजतात. ती सगळी ऋषी मंडळी धारणा, ध्यान, समाधी करु शकत होती. कुठेही मनुष्य असला परगांवी वगैरे त्याच्याबद्दल सांगता येते. धारणा, ध्यान, समाधीने मन एकाग्र त्याच्यावर झाले की सगळा उलगडा होऊ शकतो. त्यांची कांही जरुर नाही, वस्तुतः असे कांही नकोय. ईश्वरी शक्तीचे ज्ञान करुन घेण्याच्या दृष्टीने या साधनांचा उपयोग करुन घ्यायचा. सर्व ज्ञान झाले पाहिजे असे नाही. मुख्य ज्ञान (ईश्वर दर्शन) झाले की झाले. उगीचच मन इकडे तिकडे जाऊ देऊन उपयोग नाही.

नाथ महाराज जनार्दनस्वामींच्याकडे गेल्यावर जनार्दन स्वामींनी त्यांना घरातला जमाखर्च लिहीण्यास सांगितले. एकदा ती एक पैशाची चूक शोधून काढण्यासाठी नाथ महाराज रात्री बारापर्यंत जागत बसले. ही त्यांची एकाग्रता पाहून जनार्दन स्वामींनी विषय बदलून टाकला. त्यांना भक्तीमार्गाकडे घेतले. त्यांच्या मनाची तयारी झाली.

१०. म्हणजे नाथांचा काल (अज्ञानाचा) जनार्दन स्वामींना समजला. तसे ह्या लोकांना वाटत असेल असे वाटते की आपला हा मनाची एकाग्रता करण्याचा अभ्यासाचा काळ

संपला की नाही. कुठे तरी पुढे जायला पाहिजे. मन कमीत कमी निर्वासन तरी व्हायला पाहिजे --- सांगणार कोण आम्हांला. विचारणार कोणाला?

श्री- संतांचे ग्रंथ असतात त्यात सगळा खुलासा केलेला असतो. अनुभव हा विषय वेगळा आहे खरा.

११. मोठ्या महाराजांचे प्राकृत मनन जे आहे ते कोणत्या (स्टेजच्या) साधकांकरता आहे?

श्री- जितका वेळ मिळेल तितका वेळ विचार करायचा. साधनेमध्येसुद्धा जर तो विचार आला तर तो चालू शकतो. हा विचार जर सुरु झाला तर मनाची बाकीची वृत्ती बंद होते. 'यस्य देवे परा भक्ती' तशी भूमिका असेल तर 'यस्य ते अकथितातीत अर्थ:' हेही अनुभवाला येते. न वाचलेले ग्रंथ समजून येतात. ही सुद्धा जागृती आहे. मनामध्ये अमुक विषय एकदम येणं, वाचताना किंवा ऐकताना ती सुद्धा शक्ती जागृतीचेच कार्य आहे. त्या वेळेला जर ते विचार सुरु झाले तर ते शक्तीचेच कार्य आहे. जागृतावस्थेत जर असे ग्रंथ वाचन होऊन संस्कार झाले असतील तर ते साधनेच्या वेळेस मनांत येतात. येऊं देत. विचारांचा प्रवाह तर तुम्ही बंद करु शकत नाही. पुष्कळ कांही संसारातले विचार त्या वेळेला मनांत येतात. ते सुद्धा तटस्थपणें पहायचा अभ्यास करायचा. तत्त्व विचार जर मनांत आले -- वाचनामुळे किंवा वाचन न करता आले तरी हरकत नाही. न करताना यायला लागले, म्हणजे मला अशी जागृती झाली माझी अशी प्रगती झाली अशी समजूत करुन

घ्यायची नाही आणि प्रगती झाली नाही अशीही समजूत करुन घेऊन उपयोग नाही. तसे विचार येतात. ज्ञानेश्वरी म्हणजे यातूनच लिहीलेली आहे. पूर्ण जागृती पूर्ण आत्मनिष्ठेचा अनुभव आल्यानंतरसुद्धा सद्‌गुरुंचे हे सामर्थ्य आहे ही देखील त्याच्याबरोबर तितकीच जाणीव आहे. त्यामुळे ती होऊन गेली.

अभ्यास झाला, संस्कार झाले म्हणजे साधनेत ते विचार आठवतात. संस्कार होण्याकरता वाचन केले पाहिजे. इतर वेळेला २४ तास बैठक कुठे असती? कोणाच्या द्वाराने काय कार्य व्हायचं हे ठरलेलं असतं. निवृत्तीनाथांना काय लिहीता आलं नसतं? पण ज्ञानेश्वर महाराजांच्या द्वाराने ते व्हायचं होतं. गुरुंचे सामर्थ्य किती आहे हे दाखवायचं होतं. पूर्ण अनुभवाच्या अवस्थेतून ज्ञानेश्वर महाराजांनी ग्रंथ लेखन केले ना ! सांसारिक संस्कार मनांतून कमी होणं, हे संस्कार वाचनाने, आचरणाने वाढले आणि ते जरी बैठकीत आले तरी हरकत नाही.

संपूर्ण जगाचं कार्य हे अहंकाराने चाललेलं आहे. अहंकार हा मुख्य आहे. तिथून पुढं मन, बुद्धी, पुढं पुढं जायचं आहे. अहंकाराशिवाय बाजूला कसं व्हायचं हा एक प्रश्न आहे. अहंकार आणि जीवात्मा हे दोन्ही वेगवेगळं आहे.

१२. साधना जास्ती झाली तर पूजा, पोथी वाचन वगैरेला पाहिजे तेवढा वेळ मिळत नाही. निरनिराळे विकल्प मनांत येत राहतात.

श्री– शक्यतो पारायण महिन्यात पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा

पण तो जर जमत नसेल तर काय करणार? साधना होते आहे चांगले आहे. कुणीकडून तरी वेळ सत्कारणी लागला म्हणजे झाले. विकल्प, संशय इ. आले की त्याला महत्त्व न देता तटस्थपणे राहून त्यांची उपेक्षा करावी. ते येतात व जातात. आपण आपली साधना चालू ठेवावी. मात्र कांही तरी वाचन रोज झालं पाहिजे. सुट्टीच्या दिवशी जास्त वाचावे. पारायण पुढे मागे झाले तरी हरकत नाही. प्रासादिक ग्रंथ आहे. रोज कांही तरी वाचन झालं म्हणजे झालं. कांही तरी सत्कर्म घडावं. रोज रात्री आत्मपरीक्षण करावं. सबंध दिवसांत कांही ना कांही तरी सत्कर्म किती घडलं याचा विचार करावा. समर्थांनी सांगितलंय, ''उपासनेला दृढ चालवावे''.

आपण सर्व भार त्याच्यावर टाकला म्हणजे तो घेत असतो. आपण औरवाडला परशुराममहाराजांच्या दर्शनाला गेलो होतो. ते सर्व सोडून देवाची सेवा करण्याकरता येऊन राहिले होते. त्यांचे भागतच होते की नाही ! प्रपंच्यात दैन्य नसले म्हणजे झाले. कोणाचे कर्ज करु नये. दारात देणेकरी आला नाही म्हणजे झाले.

१३. अनुसंधान कसे व किती राहाणार? इतर व्यावहारिक काम करीत असताना?

श्री– इतर कर्म होत असताना अनुसंधान कमीच घडणार. कोणचंही कर्म अहंकाराकडून होतं. सबंध विश्व अहंकारावर चाललेलं आहे. अहंकार हे मोठं तत्त्व आहे. समष्टी अहंकार व्यष्टी अहंकार. तो अहंकार कशाप्रकारे वापरला जावा हे

आपल्याला कळत नाही. अहंकाराशिवाय संसारही होणार नाही, परमार्थही होणार नाही. हे मला केलं पाहिजे मी करणार हाही अहंकारच झाला की. ''युद्ध मी करणार नाही'' हाही तुझा अहंकारच आहे बाबा. अहंकाराशिवाय कांही नाही. तो अहंकार सुधारायचा आहे. अहंकार म्हणजे बुद्धीचाच भाग आहे. तो सात्विक बनवायला वेळ लागतो. अनेक जन्म लागतात म्हणून सांगून ठेवलं आहे.

'बहुनाम् जन्मनाम् अंहे ज्ञानवान् मां प्रपद्यते वासुदेवः सर्वम्' तो.परिपाक होत राहातो. केलेला प्रयत्न फुकट जात नाही. हे समजून करत राहायचं. चांगलं आहे, योग्य आहे, संतांनी मार्गदर्शन केलेलं आहे. ईश्वराची आज्ञा आहे. त्याचं फळ आत्ताच मिळालं पाहिजे असं नाही. परिपाक हा प्रत्येकाला आहे. अनेक जन्म प्रयत्न करण्यात गेले तर काय हरकत आहे?

१४. जाता येता केलेल्या नामस्मरणाला अनुसंधान म्हणता येईल का?

श्री– अनुसंधान होऊ लागल्यावर जप कमी होतो. एखादे वेळेस होणारच नाही. माळ सबंध संपणारच नाही. अनुसंधान सुरु झाल्यावर माळ हातातली पडूनही जाईल. झोप येऊन पडणं निराळं. अशा अनुसंधानामुळे पडणं हा दोष नाही. थांबला, जप संपला. पण ती स्थिती येणं फार कठीण आहे.

१५. वैखरीने जप केला तर?

श्री– वैखरीने जप चालू आहे व मनही तिकडे आहे ना. मन

नसूनही वैखरीने जप चालू असतो. त्याचंही फळ मिळतं. कोणच्याही प्रकाराने झालं तरी फळ आहे.

१६. श्री दत्तमाहात्म्यात मोठे महाराज म्हणतात रागाने घ्या, प्रेमाने घ्या, जाणतेपणाने घ्या अजाणतेपणाने घ्या त्याचं फळ आहे.

श्री– शिशुपालासारखे कसे मुक्त झाले असे परीक्षित राजाने विचारले. ईश्वराशी त्यांच्या मनाचा संबंध झालेला आहे. असं नारदांनी सांगीतलं. माध्यम द्वेष आहे. तो द्वेषही इतर कोणी करु शकणार नाही. त्याचं अनुसंधानच झालेलं आहे. इतका द्वेष ! प्रेमाने होईल, द्वेषाने होईल. सुंदर आहे. गोपालकृष्ण अत्यंत सुंदर आहे. एवढीच भावना आहे गोपींची. पण विष्णुचं रुप नको आम्हांला, म्हणाल्या. तुम्हांला आम्ही ज्या रुपात पाहीलं तेच रुप पाहिजे. म्हणजे त्यात व्यावहारिक विकार नाहीत. कंसाला भीती. माध्यम भीती. हे सगळंही त्यांनी मान्य केलेलं आहे. आपल्याप्रमाणेच कुटुंबातल्या इतरांचीही कर्म असतात ना ! त्यात अडकून पडावंच लागतं. सोडून जाता येत नाही.

म्हणून ते ''सर्व संशय:'' जाऊ शकत नाही. शेवटी पूर्णावस्थेमध्ये सर्व आहे. तोपर्यंत हे चालायचंच. कां होऊ नये असं वाटायचं. ते होत असतं चाललेलं असतं. शास्त्रप्रमाण आहे. संतांचं वचन प्रमाण आहे.

ज्यावेळेला कांही सत्कर्म चालू असेल त्यावेळेला तन्मय अवस्था होती. सगळ्यांची कुठं होती? म्हणजे आपलाही कांही परिपाक चालू आहे; एवढं मानायला काय हरकत

आहे? हे सुटल्याबरोबर पुन्हा पहिल्याप्रमाणे येरे माझ्या मागल्या होतं असं वाटून पश्चाताप होतो पण अशा वेळेला होतंय. ईश्वराची पुष्कळ चांगली चांगली चरित्र आहेत, संतांची चरित्र आहेत, त्याचं चिंतन करुनही पुष्कळ समाधान होतं.

१२-९

१७. जप झाल्यावर मनाला एक प्रकारची टोचणी लागून राहाते. सांगितल्याप्रमाणे आपण जप केला पण आपलं लक्षं कितपत लागलं त्याच्यामध्ये? मुखाने त्या नामाचा उच्चार झाला. नाही असं नाही. मग हे जे घडलं ते योग्य घडलं की अयोग्य?

श्री– जप करावा म्हणून (ज्याने) सांगितलंय ज्या प्रमाणाने त्या प्रमाणाने हे (लक्ष एकाग्र व्हायला पाहिजे, इ.) कांही सांगितलेलं नाही, तुमचा जप फुकट गेला म्हणून. आता ही तळमळ चांगली आहे. मन:पूर्वक होणं हे कांही वाईट नाही. मानसिक जप करावा म्हणतात ते. जास्ती जपाची इच्छा करायची नाही. इतके लाख झाला पाहिजे, कोटी झाला पाहिजे. ते समाधान मिळेल. मन लागलं नाही तरी हरकत नाही. फुकट जाणार नाही. मनाची एकाग्रता जास्तीत जास्त व्हावी ही ओढ उत्पन्न होणं कांही वाईट नाही चांगलं आहे. त्यामुळे हे फुकट गेलं असं कसं समजायचं? आम्ही कसं ठरविणार? आणि ते सुद्धा तसा विचार करत नाहीत. चालू आहे ना, योग्य मार्गाने जातो आहे ना बस्. ते ज्ञानी महात्मे असल्यामुळे ह्याच्या मनस्थितीचं त्याला पूर्ण ज्ञान आहे. पण ते त्याच्या (इतर अवलक्षणांकडे, दुर्गुणां) कडे पहात नाहीत. ते विचार

करतात हा सध्या ज्या भूमिकेवर आहे ती चालूं दे. दोषांकडे ते पहायला लागले तर कठीणच आहे. पहिलं संतांच लक्षण कृपाळू म्हणून दिलेलं आहे. एकनाथी भागवतात संतांची लक्षणं सांगितली आहेत. त्यांचा विचार करायचा.

शेले विणायला जरी बसले तरी त्यांचं अनुसंधान तिकडे असे. आणि रामाने येऊन ते शेले विणायचे. ती केवढी मोठी अवस्था ! त्यामुळे त्याला किंमतही जास्ती यायची म्हणे. आणि हे आपले बसलेले आहेत. ही अवस्था मिळावी ही तळमळ चांगली आहे. पण व्यवहारात कसं राहाता येईल आपल्याला? सगळे लोक बोलणार, टीका करणार. तन्मय अवस्था झाल्यावर संबंधी सगळे लोक पुढे येणार की. आपण काय रानावनांत एकटे राहात नाही.

१३-२

---

१८. हा बाह्य संघर्ष झाला. पण कित्येक वेळेला आतून एक संघर्ष निर्माण होतो. आपल्याकडून ऐकलेलं असतं. अंतर्मुखता जास्तीत जास्त साधली पाहिजे आणि प्रत्यक्षात मात्र आपण बहिर्मुखच असतो. म्हणजे व्याप कमी करायच्या ऐवजी आपण न कळत व्याप वाढवून बसतो. फार पुढे गेल्यावर जाणीव होते महाराजांनी काय सांगितले होते आणि आपण प्रत्यक्ष काय करुन बसलो आहोत. तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते आणि हेच चक्र सतत चालू असतं.

श्री– सगळंच ते अचिंत्य आहे. कां होतं याचं कांही उत्तर मिळणार नाही. कुठं कुठं मागे जायचे? होणं बरं नाही एवढी तळमळ

असायची. त्यांनी सांगितलेली साधना चालू ठेवायची. मनाचा स्वभाव त्याच्या कर्माप्रमाणे झालेला असतो त्याला काय करणार?

मोठ्या महाराजांच्या चरित्रात आहे. एकसंबेकर कोणी चांगले कर्मानुष्ठान करणारे होते. ते वाडीला आल्यावर महाराज त्यांना कांही, औषध, मंत्र सांगायचे, ते कांही तरी कोणाजवळ बोलले, स्वामी महाराजांना ही कटकट कशाला पाहिजे? महाराजांच्या कानावर ते गेलं. कांही बोलले नाहीत.

पुढे कधी तरी एकसंबेकरांना वेदांत पाठ सांगताना अडचण आली वाटतं. किंवा कांही तरी प्रसंग आला. त्या दिवशी कांही पाठ झाला नाही. कोणी तरी त्यांना ह्याचे कारण विचारल्यावर एकसंबेकर म्हणाले, प्रारब्ध आमचं असं आहे. त्यामुळे असं झालं.

हे महाराजांना समजलं. महाराज म्हणाले, ''प्रारब्ध सगळ्यांनाच असतं. आम्हालाही प्रारब्ध आहेच की. (औषधे, मंत्र वगैरे) सांगावे लागतात. महाराजांसारख्यांची मोठी तयारी आहे. सर्वही कर्तृत्व ईश्वराचं मानावं लागतं. ईश्वराचं कर्तृत्व नाहीये वस्तुत: पण या भूमिकेवरती आल्याशिवाय ते कळत नाही. सगळं ईश्वराचं मानलं पाहिजे. चांगलही असो वाईटही असो. अनुकूल प्रतिकूल. सगळंही ईश्वराने केलेले आहे. त्याला दोष देण्यासाठी नाही पण शक्ती आहे त्याची. आणि त्याला कारण आमचंच कर्म त्याने घेतलेले आहे. त्यामुळे त्याला दोष येत नाही. नाही तर दु:खही देणारा ईश्वर आहे म्हटलं तर ईश्वराचा अपमान

होईल की. कर्माचा संबंध तिथे जोडलेला आहे.
समर्थांनी सांगितलंय –
*सत्कर्म योगे वय घालवावे ।*
एवढं पहायचे आपण. बाकी कांही नाही. क्रियमाण कर्म जितकं जितकं जास्ती शुद्धं होत जाईल तितकी मागची पुढची सगळी बंद होतात. होऊन गेलंय, झालं. संपलं. क्रियमाण चांगलं ठेवायचा प्रयत्न करायचा. आत्मज्ञान झाल्यानंतर सर्व कर्मांचा – क्रियमाण कर्मांचाही संबंध राहात नाही म्हणतात. संचितही जातं, क्रियमाणही जातं, सगळंच जातं.
तुकाराम महाराजांची गोष्ट सांगतात ना. थंडीच्या दिवसात भिकारणीला पातळ दिले. ती बायको बोलणारच की. पण बायकोला मिळू नये हा त्यांच्या उद्देश नाही. ती खरी दया आहे त्यामुळे त्यांना कांही भान नाही. म्हणजे दया वगैरे सगळे भाव इतके पक्के झाले पाहिजेत की पुढं काय होईल, कोण काय बोललं वगैरे कांहीही विचार नाही. उसाचा भारा त्यांनी आणला. सगळी मुले एकेके ऊस घेऊन गेली. म्हणजे आपल्या मुलांना ऊस द्यायचा नाही म्हणून का इतर मुलांना वाटला? त्यांच्या मुलांनी घेतला असता तरी कांही वाटलं नसतं.
ही मोठी वृत्ती आहे. ते (दया इ.) भाव पक्के व्हायला वेळ लागतो ना ! परिपाक व्हायला. आक्षेप घेणारे आक्षेप घेऊ शकत नाहीत. म्हणजे वेदांत चुकीचा आहे वगैरे वाटेल ते आक्षेप आहेत ना. तुकारामांचे घरच्यांकडे लक्ष नाही. सगळे

बोलणार.
ज्याने त्याने आपल्या मनाचे निरिक्षण करायचे.
संतांची बुद्धी मोठी असती. ते म्हणतात, ईश्वराचं कर्तृत्व आहे.
*ठेविले अनंते तैसेची राहावे ।*
हे त्यांनी मानून प्रारब्धसुद्धा बाजूला ठेवलंय. त्याची इच्छा. उदयनाचार्यांनी ''ईश्वरसिद्धी'' नांवाचा प्रसिद्ध ग्रंथ लिहिला. त्यात वेदशास्त्राचे कांही आणले नाही. केवळ युक्तीवादाने सर्व सांगितले आहे. प्रारब्ध कर्म आहे हे अगोदर सिद्ध केलं त्यांनी. आणि ती ईश्वराची इच्छा आहे. जर ईश्वराने कार्याकरता कर्म घेतली, काल घेतला असं म्हटलं तर ईश्वराला स्वतंत्रता कुठे आली? म्हणजे काल मोठा झाला. तो ईश्वराच्या सहाय्याला जातो. जीवांचं कर्म त्याला सहाय्याला लागतं. सहाय्याशिवाय सृष्टी करता येत नाही, असा त्याचा अर्थ होईल.
ईश्वर भाव वाढत गेला म्हणजे हे सगळं कमी होतं. सगळे गुण येतात, दोष जातात. सगळं होऊन जातं. गुणदोष दृष्टी संपून जाती. गुणदोष दृष्टी हाच मोठा दोष आहे म्हणतात ना. समदृष्टी उत्पन्न व्हायला पाहिजे.

१९. म्हणजे गुणही नाहीत व दोषही नाहीत.

श्री– कांहीच नाही. उद्धवजींना सांगताना गुणदोषांची व्याख्याच भगवंतांनी सांगितली आहे. गुणदोष दृष्टी हाच दोष आहे. गुण दृष्टीही नाही आणि दोष दृष्टी नाही म्हणजे अनुसंधान अखंड आहे. त्यामुळे कांहीच नाही. हा खरा गुण आहे

म्हणाले. ही मोठी व्याख्या आहे त्यांची. जीवभाव आहे, अज्ञान आहे, कर्म आहे, काळ आहे. ह्या सगळ्यामध्ये आम्ही गुंतलेलो आहोत. एक आहे, अद्वैत आहे; नुसतं म्हणून काय उपयोग? ती भूमिका आल्याशिवाय. त्यातूनच जायचंय.

अहंकार जायला पाहिजे म्हणजे संपलं. अहम् हाच पहिला प्रतिबंध सांगतात. शास्त्रकार जीवभाव नाहीसा झाला पाहिजे. चित्तं आणि आत्मा एक होऊन गेलेले आहेत. अहम् तोडून काढायचा आहे. अहम्‌ला बाजूला करणंच फार कठीण आहे. हृदय ग्रंथी म्हणतात त्याला. चांगदेवसुद्धा त्यात सांपडले होते ना ! इतकं योग सामर्थ्य असतानासुद्धा तो अहम् गेला नाही.

निवृत्तीनाथांसारख्या सद्‌गुरुंचा अहंकार गेलेलाच आहे ना ! त्यामुळे त्यांना कमीपणाही वाटत नाही जास्तीपणाही वाटत नाही. महत्त्वाची घटना घडली तरी मोठेपणा मिळाला असेही नाही व कांही घडले नाही तर त्याचा विषादही नाही. अशी स्थिती आहे. त्यांचं कार्य त्यांनी करुन टाकलं. लोकसंग्रह सृष्टीकरता झाला.

विवेकानंदांकडून पुढे मोठा लोकसंग्रह होणार आहे म्हणून रामकृष्णांनी त्यांच्याकडे विशेष लक्ष दिले असे नाही. सगळ्यांकडेच दिले. सर्व सामान्यांना कदाचित विशेष लक्ष दिले असे वाटेल पण तसे नाही.

प्रत्येकाची कार्यक्षेत्र वेगवेगळी असतात. आणि कार्यक्षेत्र स्वत:ची आहेत असं कुठं मानतात ते. त्यामुळे त्याच्यापेक्षा

माझ्यावर जास्ती कृपा झाली असंही वाटण्याचा संभव नाही कुणी कांही म्हटलं तरी. त्याच्यापेक्षा माझ्यावर जास्त लक्षं आहे असं मानलं तर संतांकडे समदृष्टी नाही असे होईल.

ज्ञानी महात्म्यांना कोणत्याच गोष्टीचे आश्चर्य वाटत नाही कारण सगळं ते ईश्वराचेच आहे असे ते समजतात.

असलेलंच समजून घ्यायचं आहे तेच मोठं कठीण आहे. नवीन कांहीही नाही. पण तेच कळत नाही.

ज्ञानाचं साधन म्हणजे प्रमाण. इंद्रिय म्हणा.

प्रमाता म्हणजे ज्ञान करुन घेणारा.

ज्याचं ज्ञान करुन घ्यायचं ते प्रमेय.

ध्येयाकार मनोवृत्ती झाल्यावर तीन कुठं राहीली? एक रुपच झालं. मी याचं ध्यान करतो आहे म्हणजे मी आहे, ती वस्तू आहे आणि त्याचं ध्यान माझं चाललेलं आहे. हा भेद आहे. शेवटी तोही निघून जातो. म्हणजे भेदातून जावं लागतं मात्र. त्या साधनानी मन एकाग्र करण्याचा प्रयत्न करावा लागतो. शेवटी मग ते एक होतं. व्यवहार सगळा संपतो. त्यामुळे मीही गेला मी ज्या साधनांनी ज्याचे ध्यान केलं असा अभिमान राहात नाही. त्यामुळे अहंकार बाजूला होतो, जितकं जितकं आपण ध्यान, समाधीपर्यंत जाऊ लागलो की. 'शुद्ध अहम् साक्षीरुप' त्या वेळेला समजतो. त्याकरता सर्व कर्ता ईश्वर आहे ही तरी बुद्धी झाली पाहिजे. सर्व विश्वरुप तो आहे मीही विश्वरुप आहे ही जाणीव झाली की होतं.

ईश्वर हा मर्यादित नसून सर्वत्र आहे हे समजून घेण्याकरताच नामदेवांना विठ्ठलाने विसोबा खेचरांकडे पाठवले.

जनाबाईंची सेवा चालू असतानाच अहंभाव गेला. त्यामुळे श्रम वाटले नाहीत.

गुलाबराव महाराज गोपीभाव घेऊन असायचे. ते स्वत:ला ज्ञानेश्वर कन्या समजत.

ब्रह्म हे शाश्वत आहे म्हणजे नित्य आहे. त्रिकालाबाधित. स्वयंप्रकाश आहे, ज्ञानरुप आहे. अशा वेगळ्या वेगळ्या रुपांनी त्याचं ज्ञान करुन घ्यायचं. वस्तुत: ती वेगळी वेगळी रुपं नाहीच आहेत. ज्ञान झाल्यानंतर कशाचीच भीती राहीलेली नाही. काल सुटलेला आहे. काल सुटल्याशिवाय हे सुखदु:ख कमी होत नाही. पुढं कसं होईल, आत्ता बरं आहे. आत्ताचे हे संकट कसे दूर होईल. कालाचा कांहीही संबंध नाही असा मी आहे. म्हणजे हे सर्वच संपलं. स्वयं प्रकाश आहे. ज्ञानरुप म्हणजे. मी आनंदरुप आहे.

वस्त्राचे तंतू म्हणजे उपादान. उपादान म्हणजे अवयव. बाहेरचे सगळं नाम वगैरे निमित्त. बहिरंग. त्याच्यामधले अंतर्गत कारण म्हणजे उपादान. जग उत्पन्न होण्यास उपादान कारण म्हणून शक्ती आहे त्याची. त्याचंच कार्यकारण ती बनलेली आहे. सांख्यांनी हे सिद्धं केलं. कारण कार्य निराळं, कारण निराळं, म्हणजे ते द्वैत फार वाढलं. तार्किक वगैरे. आरंभवाद. म्हणजे नवीन कार्य झालं असं ते म्हणतात. नवीन कार्य नाही. कारणच कार्य बनतं. परिणामवाद. सांख्यांनीही चांगला मांडला आहे. त्यामुळे द्वैत पुष्कळ

कमी झालं. तंतू निराळे वस्त्र निराळं असं नाही. तंतूचं वस्त्ररुप बनले आहेत. सोन्याचाच दागिना झाला. नवीन नाही. बीजाचा वृक्ष झाला. बीज नसताना वृक्ष कुठं होत नाही !

नवीन कार्य झालं म्हटलं तर वाळूतून तेल कां निघू नये? कुठेही कार्य नवीन होतं ना, कारणाशी कांही संबंध नाही. त्याला ते शेंगदाणेच पाहिजेत, तीळच पाहिजेत कशाला? वाळूतून कां निघू नये? हा त्यांचा युक्तीवाद आहे. त्याच्यामधल्या शक्तीचं ते कार्यच आहे. सूक्ष्मरुपाने. पण त्यांनी ह्या चेतनावर सोडून दिलं म्हणून खंडन त्याचे वेदांत वादाला जवळ आहे. कार्य कारण एक मानून त्यांनी प्रकृतीच ही सर्व झालेली आहे. कांही संबंध नसताना झालेली आहे. वेगळेपणा त्यांनी असा मांडला. चेतन निराळा प्रकृती निराळी. प्रकृती कार्य करणारी आहे. चेतनाचा संबंध नसताना कुठंच होत नाही कार्य. ईश्वर शक्तीने कार्य झाल्यामुळे न्यूनाधिकपणा त्यात कांही नाही. सगळ्यांना आपलंच काम आहे असं वाटून झालं. नियुक्ती बुद्धीने नाही. समष्टी बुद्धीने झालं.

२०. ते खरं आहे पण आपल्याला कां वाटलं प्रतिबद्ध आहे?

श्री– ते सिद्धांत, ती जाणीव लक्षात राहायला पाहिजे. मानायला काय हरकत आहे ! वैयक्तिक झालं अशी भावना येत नाही. वैयक्तिक असं वाटलं की गेलं. कर्तृत्वाभिमान वगैरे

सगळं पाठीमागे लागलं.

''चिरंजीव पद'' नाथांचं आहे ना. त्यात त्यांनी मन कसं गुंतत जातं ते दिलेलं आहे. शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध. सांपडला जातो तो जीव.

२१. मोठ्याने जप केला तर अंतर्मनात विचार येतात मनांत जप केला तर अंतर्मनात आणखी कांही विचार येत राहातात.

श्री– विचार येणारच. विचार थांबायला वेळ लागणार. मनांतले विचार एकदम कसे थांबतील. मनाची स्थिरता हळूहळू होणार. नामस्मरण शांतपणे केलं म्हणजे तिकडे लक्ष लागतं. त्या अक्षराकडं लक्ष ठेवून सावकाश स्मरण करायचे. म्हणजे एकाग्रता हळूहळू होते.

२२. साधनेत आपली प्रगती होते हे कसे समजायचे?

श्री– निर्विकार वृत्ती होत गेली की त्यावरुन समजते. मानसिक विकार, कांही दोष वगैरे जर कमी कमी होत गेले तर प्रगती होती. कांही संत वाङ्मय वाचावं. संतांची चरित्रं वाचूनही मनावर चांगला परिणाम होतो.

२३. साधनेत येणारे झोपेंचे विघ्न दूर कसे करायचे?

श्री– आवश्यक तेवढी झोप पाहिजेच आहे. झोप मुद्दाम कमी करायची असंही नाही.

२४. एकदा बैठक झाली म्हणजे संध्या इत्यादी नित्यकर्म करण्याची आवश्यकता नाही ना?

श्री – ही बैठक झाली तरी शास्त्राने सांगितलेली नितकर्म करावीच लागतात. ती टाळायचा किंवा न करण्याचा प्रश्नच येत नाही.

२५. श्रीदत्तमाहात्म्यात ''चुकून जरी अग्नीला स्पर्श झाला तरी तो चटका देतो तसे नामाचे आहे'' अशा आशयाची ओवी आहे ही कोणत्या साधकांना लागू आहे?

श्री- जसजशी प्रगती होत जाईल तसतशी त्याची प्रचिती येते. नामाचे फळ हे मिळतेच.

२६. श्रीदत्तमाहात्म्यात ''या गोविंदाची जरी सकाम भक्ती घडे तरी--अंती निष्काम करी ती'' या ओवीतील ''अंती'' म्हणजे कधी?

श्री- याच जन्मात असे नाही. कुठल्या तरी जन्मात. कारण जीव सतत निरनिराळे जन्म घेत असतो. तळमळीप्रमाणे घडते सर्व.

२७. ध्यान पहाटे एकदाच करावे कां रात्रीही झोपण्यापूर्वी पुन्हा करावे?

श्री- जेव्हा मनाला वाटेल त्यावेळी ध्यान करावे. अभ्यास अमुक एक वेळेलाच करावे असे कांही नाही.

२८ साधनाभ्यासासाठी जागेचे बंधन असावे का?

श्री- साधनाभ्यास उघड्या जागेत न करता, देवाजवळ जागा नसली तरी आपल्या खोलीत दार झाकून केली तरी चालेल. नित्य साधनाभ्यास श्रद्धेने चालू ठेवणे हितावह आहे.

२९. सत्कर्म योगे वय घालवायचे म्हणजे नेमके काय करायचे?

श्री- संतांनी ज्याप्रमाणे सत्कर्म करीत आपले आयुष्य घालवले तसे घालवायचे. त्यांच्या जीवनाचा अभ्यास केला की आपल्याला मार्गदर्शन घडते. संतांच्या वाङ्मयातून मार्गदर्शन मिळते.

३०. घरात देवाची प्रसन्नता केव्हां राहील?

श्री- आपल्या घरच्या देवांची व्यवस्था वेगळी असावी. देवांना एकांत, स्वच्छ व प्रसन्न वातावरण आवडते. तशा वातावरणामुळे त्यांच जवळ बसून आपली साधनाही व्यवस्थित होते. मन प्रसन्न राहाते.

३१. आपण षोडशोपचार पूजा करतो तशीच मानसपूजा कराचयी कां?

श्री- तशीही करता येते. एकेक अवयवाचे ध्यान करायचे. ध्यान करणे ही देखील मानसपूजाच आहे. प्रत्यक्ष षोडशोपचार पूजा झाली तरी हरकत नाही. म्हणजे त्यात दुसरा विषय नाही. मानसोपचार, ध्यानाचा अभ्यास नारायणस्वामी महाराज करीत होते ना ! म्हणजे मन अत्यंत स्थिर झाल्यामुळे मानसपूजा होते. शांताकारं भुजगशयनं – असे जे कांही वर्णन केलेले असते त्याप्रमाणे स्वरुपाची कल्पना करुन पूजा मनानेच करायची. 'यथा देहे तथा देवे'. आपल्याला जसे लागते तसेच देवालाही अर्पण करायचे. त्यामुळे मन जास्ती जास्ती स्थिर होत जाते. विवेक वाढतो. असंग होते मन. संसारातून बाजूला होते. शांती आपोआप प्राप्त होते. वासनेमुळेच अशांती आहे ना !

३२. शिरोमे राघव: पातु भालं दशरथात्मज: -- अशी प्रार्थना करायची कां?

श्री- संरक्षणाची प्रार्थना आहे ती. स्वत:च्या अवयवांचे संरक्षण करायचे, अशी प्रार्थना आहे. ती मानसपूजा नाही. त्या त्या अवयवाचे स्मरण करुन त्या देवतेने त्यांचं संरक्षण

करावे म्हणून ती प्रार्थना आहे.

३३. एका विद्यार्थ्याने श्रींच्या दर्शनाला गेल्यावर नमस्कार करताना श्रींनी विचारले, आज काय कॉलेजला दांडी मारली का? त्या विद्यार्थ्याने होकार दिल्यावर श्री म्हणाले, आता परत गेल्यावर अभ्यासाला लागा.

३४. एका शालेय विद्यार्थ्याला परीक्षेत मार्कस् कमी मिळाल्याचे त्याने श्रींना सांगितल्यावर श्री म्हणाले, विद्यार्थ्यांनी रोज देवाचे काही तरी केले पाहिजे. नामस्मरण करावे, संतांची चरित्रे वाचावीत.

३५. एक गृहस्थ श्री दौऱ्यात असताना ओलेत्याने श्रींना नमस्कार करायला आले तेव्हा श्री त्यांना म्हणाले, अहो कसले सोवळे घेऊन बसलात. प्रवासात इतके कटाक्षाने सोवळे ओवळे पाळता येत नाही.

३६. एका गृहस्थांनी श्रींनी सांप्रत काळात मंदिर का बांधू नये हे समाजावूनही श्री दत्तमंदिर बांधले आणि ते तयार झाल्यावर श्रींना सांगायला आले.

श्री – पूजेची व्यवस्था काय केली? ब्राह्मण पूजारी मिळाला का?

क्ष – महाराज, त्या गांवात कोणी ब्राह्मण नाहीत.

श्री – मग पूजा कोण करणार?

क्ष – जर गांवात कोणी ब्राम्हणच नाहीत तर पूजा कोण करणार?

श्री – जर पूजेची व्यवस्था होऊ शकत नाही तर मंदिर बांधायचेच कशाला? हा विचार मंदिर बांधण्यापूर्वी तुम्ही

करायला पाहिजे होता. तुम्ही दत्ताची मूर्ती स्थापन करणार आहात ना?

क्ष – हो महाराज. त्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करणार आहोत.

श्री – चल काय आणि अचल काय दत्ताच्या मूर्तीचे नियम कडक असतात. एक वेळ शंकर, राम, कृष्ण, पांडुरंग वगैरेंच्या मूर्ती स्थापन केल्यावर त्यांची पूजा कोणीही केली तरी चालते. पण दत्ताच्या मूर्तीची पूजा करायला चांगला ब्राह्मण हवा. (या संदर्भातला श्रीमद् भगवतगीतेतील श्लोक श्रींनी सांगितला) तिची पूजा अर्चा यथा योग्य शास्त्रीयरित्या झाली नाही तर त्या माणसाचे कल्याण होत नाही.

तरीही ते गृहस्थ तेच तेच सांगू लागले शेवटी श्री त्यांना म्हणाले, 'बघा तुम्हाला योग्य वाटेल ते करा. या आता.'

३७. पुढे एका प्रसंगाने एका निराश होऊन श्रींकडे आलेल्या गृहस्थाला म्हणाले, काही झाले तरी आपण निराश होता कामा नये. निराश झाले की आपल्याला समस्येवर मार्ग सापडण्याची शक्यता असते तीही आपण घालवून बसतो. कारण त्या वेळेला आपली बुद्धी नैराश्यामुळे कामच करीत नाही.

३८. क्ष – एखाद्या संतांच्या ग्रंथाचा अभ्यास गुरुंच्या मार्गदर्शनाशिवाय कसा करायचा?

श्री – एकलव्याने नाही का विद्या मिळविली? त्याने गुरुंचा पुतळा बनवून जी विद्या मिळविली ती अर्जुनालासुद्धा मिळवता आली नव्हती. तसे आपण करायचे. वाचन, चिंतन, मनन सतत करीत रहायचे. पुढे पुढे आपल्याला त्याचा अर्थ समजायला लागतो. कोणी तरी मार्गदर्शन करणारा भेटतो.

एखाद्या वेळेस लहान बालकाकडूनही आपल्याला मार्गदर्शन मिळते. आपण आपले करीत रहायचे.

३९. गाणगापूरमध्ये पारायण कुठे करावे?

श्री– मंदीर, अष्टतीर्थ, संगम ही मुख्य स्थाने आहेत पारायण किंवा साधनेला. पण तिथे जर जागा मिळाली नाही तर श्रींना प्रार्थना करुन कुठेही बसावे.

४०. प्रश्नावलीतले वाचन कधी करावे?

श्री– सकाळी स्नान झाल्यावर किंवा संध्याकाळी सवडीप्रमाणे वाचा इतर कांही नियम नाहीत.

४१. श्रीवासुदेव मनन सार चा अभ्यास कसा करावा?

श्री– वाचन करता करता बोध होतो. त्यांनी काय काय सिद्धांत मांडलेले आहेत हे मनाला पटायला लागले की झालं. तितक्या श्रद्धेनं त्यांची प्रार्थना करुन बुद्धीला ते आकलन होण्यासारखी बुद्धी झाली पाहिजे.

४२. मन अन्नापासून बनले आहे असे म्हणतात. कोणते अन्न घ्यावे म्हणजे मन सात्विक बनेल?

श्री– सात्विक अन्न घ्यावे म्हणजे मन सात्विक होते.
युक्ताहारविहारास्य – कामक्रोध वाढविणारे राजस व तामस आहार कमी करावेत. सात्विक आहाराकडे ध्यान असले म्हणजे झाले. आहारशुद्धी सत्वशुद्धीः ।
सत्वशुद्धी दृढा मतिः ।

४३. कांदा व लसूण सोडावे काय?

श्री– शरीर शास्त्र वेगळे आहे. हे धर्मशास्त्र आहे. कांदा व लसूण

शरीरासाठी आवश्यक आहे असे शरीरशास्त्र सांगत असले तरीही धर्मशास्त्रांत वेगळे सांगितले आहे. चित्तशुद्धी व्हावी व मनाची सात्विकता वाढावी म्हणून कांदा व लसूण वर्ज्य केलेच पाहिजे. धर्मशास्त्राच्या दृष्टीने ते नको आहे. कांदा व लसूण आपण खाल्ले नाही तर शरीर राहणार नाही असे शरीर शास्त्रज्ञ सांगतात. ती गोष्ट वेगळी आहे. लोक त्यामुळे असे म्हणतात की आम्ही नाईलाजाने कांदा व लसूण खातो. एक स्वामी महाराज उगारचे स्वामी नारायणानंद सरस्वती आहेत. पूर्वीही वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज होते. ते आजारी पडल्यावर कांहीही औषध घेत नसत. नुसते पडून रहायचे. ताप आला की पडून रहायचे. त्यामुळे बरे व्हायचे.

४४. अन्नदोष नेमके काय करतो?

श्री- बुद्धी भ्रष्ट करतो.

४५. झोपेवर नियंत्रण कसे आणायचे?

श्री- झोप कमी करायची असेल तर आहार कमी केला पाहिजे. झोपण्यास योग्य वेळ १० ते ४. गुरुमहाराज ही वेळ इतरांना सांगत व स्वत:ही पाळत असत.

४६. क्ष – मनाच्या रजो, तमो वृत्ती आणि शारिरीक व्याधी यांचा काही परस्पर संबंध असतो का?

श्री – असतो ना. मनाच्या वृत्तींचा, विचारांचा शरीरावर परिणाम होतोच. रक्तदाब, मधुमेह वगैरे रोग काय मानसिक तणावांमुळेच निर्माण होतात ना. आपण आपली वृत्ती, मन जेवढे शांत ठेवता येईल तेवढे ठेवण्याचा प्रयत्न करायचा.

४७. रागावर संयम कसा येणार?

श्री– संतांची चरित्रे वाचावीत. नाथांनी १०८ वेळा स्नान केले. आपण कोण आहोत, शुद्ध अहम् कोण आहे याचा विचार केला पाहिजे. शब्द तरी कुठे स्थिर आहेत? त्या स्वर शब्दांचा आपल्या स्वरुपाशी कांही संबंध नाही असे सगळे विचार पटायला लागले म्हणजे विकार हळूहळू कमी कमी होत जातात. चरित्र वाचून आपल्याला तळमळ लागते. तळमळीने प्रार्थना केली म्हणजे हळूहळू होतं.

चारी भाऊ मरुन पडलेले आहेत आणि तो यक्ष प्रश्न विचारतो आहे. प्रश्नांची उत्तरे द्यायला मन स्थिर पाहिजे की नको? संपला सगळा संसार संपला, धर्मराजाचा. कुठलं राज्य आणि कुठलं काय ! सगळं गेलं पण निराश नाही. हे ईश्वराकडून मिळतं.

४८. कोणत्या संतांचे चरित्र वाचावे?

श्री– कोणत्याही संतांचे चरित्र मनाच्या स्थिरतेला, शांतीला कारण आहेत.

वीतरागविषयम् वा चित्तम्

योगाभ्यासाने येणारी मनाची स्थिरता निराळी आहे. संत चरित्र वाचनानेसुद्धा मनाला स्थिरतायेते, विचारपूर्वक, श्रद्धेने, प्रेमाने वाचले म्हणजे. ईश्वराची चरित्रं आहेत तशी संतांचीही चरित्र आहेत. त्यांच्या चिंतनाने मनावर परिणाम होतो, पापक्षय होतो. पापक्षय होत गेला म्हणजे मग मनाची स्थिरता होती.

श्री– नित्यानित्य विवेकच मुख्य आहे. तो एकदा पक्का झाला

म्हणजे होतं. शम मुख्य आहे. निर्वासन अंत:करण जितकं जितकं होत जाईल तितकी शांती आहे. पूर्वांग आणि उत्तरांग. वैराग्य हे पूर्वांग आहे. इंद्रिय दमन, समाधान, शांती, श्रद्धा हे सगळं उत्तरांग आहे. त्यामुळे वासना कमी होतात. वासना कमी झाल्याशिवाय शांती नाही. संतांच्या ग्रंथामध्ये सगळं मार्गदर्शन आहे. ते आचार्यांचं वाक्य वृत्ती चांगलं आहे. अभ्यास काय करावा, कसा करावा. एक वृत्ती संपून दुसरी वृत्ती उत्पन्न होण्याच्या मधला काळ म्हणजे तो आत्मस्वरुप आहे वगैरे काय काय त्यांनी दिलेलं आहे. तिकडे अनुसंधान ठेवलं म्हणजे होतं. साक्षी कसा आहे. सुखही नाही आणि दु:खही नाही. असं स्वरुप आहे. आपल्यापेक्षा दुसरा जास्ती सुखी पाहिला की दु:ख आहे.... वासना मुख्य कमी कमी होत गेल्या पाहिजेत.

विचार हाच मुख्य आहे. विचारांनी एकेक बाजूला करायचं. अनित्य काय आहे त्याचे पृथक्करण करायचं. क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक झाला पाहिजे. शरीरापेक्षा आत्मा वेगळा आहे. खरा शुद्ध अहम् कोण आहे. ज्ञानेश्वरीचा तेरावा अध्याय त्या करताच आहे. क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक.

दत्तमाहात्म्यातही पुष्कळ मार्गदर्शन आहे. योगमार्ग आहे. भक्तीमार्ग तर आहेच आहे. भक्तीमार्गाकरताच तो ग्रंथ केलेला आहे. चरित्र वेगळी वेगळी आहेत.

४९. रागद्वेष लोभ वासना हे गेल्यामुळे ऑफिसातील कामाची कार्यक्षमता कमी तर होणार नाही?

श्री– रागलोभ जरुरी आहेत. अतिरेक कोणताही वाईटच.

व्यवहारापुरते ते पाहिजेतच. रागलोभ जरुर हवेत. कामक्रोध नाहीसे होणे हे पुढचे काम आहे. कामक्रोधाचा आवेग आवरणारा तोही सुखी आहे. तोही योगी आहे. समाधी ही अवस्था त्यालाही आहे.

५०. नोकरीत वरिष्ठ–कनिष्ठ संबंध कसे सांभाळावेत?

श्री– आता आपण अधिकारी झाला आहात तेव्हां आता आपल्याला सारखी रजा घेता येणार नाही. आणखी जबाबदारी वाढली आहे. आपल्या हाताखाली जे लोक असतील त्यांच्यावर अन्याय होऊ देऊ नका. त्यांचे चुकीचे निर्णय मात्र मान्य करु नका. वरिष्ठांना मान द्या. त्यांनी जर तुमच्याकडून एखादे वेळी गैरवाजवी कामाची अपेक्षा केली किंवा अन्याय केला तर जरुर विरोध करा. परमेश्वर तुम्हांला जरुर साथ देईल. नोकरी व्यवसाय ही सुद्धा एक प्रकारची ईश सेवा, साधना आहे.

५१. बऱ्याच वेळा आपण व्यावहारिक दृष्ट्या सहज बोलून जातो की दोन महिन्यांनी अमुक एक कार्यक्रम करायचांय. मग असे जे विचार करतो––हे चुकीचे आहे कां?

श्री– राम मंदिर बांधायचे चाफळला. उत्सव करायचा. समर्थांनी केला की नाही संकल्प? तो पुरा झाला की नाही? मीही एक नोकर आहे हीही जाणीव आहे. माझा संसार आहे म्हणण्यात दोष आहे. देवाचा संसार समजून करायचा. भरताप्रमाणे संसार करायचा दुर्योधनाप्रमाणे नाही.

थोडे कर्तृत्वभावाचे समाधान पाहिजे. होतंय. माझ्या हातूनही कांही होतंय एवढी जाणीव हवी. निराशा असून उपयोगी

नाही. ते काय नामदेवांचे पद आहे ना –

पतित पावन न होसी म्हणून जातो माघारा

म्हणजे थोडीशी त्यांनी जाणीव दिली.

चालवी शरीर कोणाचीये सत्ते । कोण चालवी ते हरिवीण।

माणसाची अहंता देवच चालवितो. संतांनी निरनिराळे सिद्धांत दाखविले आहेत. भीष्म द्रोणांनी किती प्रयत्न केले. श्रीकृष्णांनी स्वत: शिष्टाई केली. पण शेवटी ते होणार आहे. एक तो आला दुर्योधन म्हणून काय प्रयत्न करायचा नाही? प्रयत्न करायचा, चांगलं अहे. जे होईल ते होईल. प्रतिकूल झाले तरी मनाला लावून घ्यायचे नाही कांही नाही.

उदयनाचार्य म्हणून मोठे नैय्यायिक होऊन गेले. मोठे कृष्ण भक्तही होते. ते एकदा मथुरेला दर्शनाला गेले. ते येण्यापूर्वीच दरवाजे बंद झाले. त्यांनी उभे राहून सांगितले, मी तुमच्या दर्शनाला आलो. तुमच्याजवळ ऐश्वर्य आहे. पूर्ण शक्ती आहे पण त्याचा तुम्हांला गर्व झालेला दिसतोय. पुन्हा जर बुद्ध या ठिकाणी आला तर तुमचे अस्तित्व माझ्यावर अवलंबून आहे हे लक्षांत ठेवा.

लगेच दरवाजे उघडले. असे आहे. चूक नाही. तुमच्या सांगण्याप्रमाणे मी वागतो आहे.

भगवंतरावांनी एक गोष्ट सांगितली. कोणी तरी व्याख्यानामध्ये महाराजांच्याबद्दल आक्षेप घेतला. महाराजांचे मोठे अधिकारी शिष्य होते. त्यांनी त्याच्यावर त्या गृहस्थांना उद्देशून एक लेख लिहिला. तरी पण महाराजांना तो लेख दाखवून

पाठवू असे त्यांनी ठरवले. त्यांनी तो लेख दाखविल्यावर महाराज म्हणाले, तुम्ही तुमची साधना करीत चला. जाऊं दे.

म्हणून हे शिष्य परत आले व तो लेख ठेवून दिला.

दुसऱ्याला सुधारण्याचा संकल्प, प्रयत्न, इच्छा केल्याचा अहंकार उपयोगी नाही. आपण कोणाला सुधारु शकतो कां? त्यामुळे मी सुधारणा केली म्हणून पुन्हा अहंकार वाढायचा त्यापेक्षा आपलं

*आम्हां अघलेश न बाधो*

केवढं आहे ! तुमची सेवा, तुमची प्रार्थना करुन आम्हांला अघलेशसुद्धा बाधणार नाही. संतांचे आश्वासन आहे –

*वेदांताचा अर्थ आम्हासीच ठावा*

यात कांही कोणाची निंदा नाहीये. आपले अभंग बुडाले म्हणून वाईट वाटले नाही. अभंग मिळावेत म्हणून १२ दिवस उपास केला. आपला अभंग नाहीये. पांडुरंगाचे अभंग असतांना असे कसे झाले. दुसऱ्या एखाद्याने माझे अभंग गेले म्हणून आक्रोश केला असता. देवाचे अभंग आणि असे कसे झाले इतकेच वाटले.

२-६-

५२. प्रश्न तुकाराम व रामदासांची भेट झाली असेल कां?

श्री– समकालीन होते ते. नाही कां? प्रत्येकाची कार्य पद्धती वेगळी, कार्य क्षेत्र वेगळे. नामदेवांच्याबद्दल ज्ञानेश्वरांच्या मनांत फार आदर होता. आपल्या बरोबर नामदेवांनी तीर्थयात्रेला यावे म्हणून त्यांनी बराच आग्रह केला. नामदेवांनी सांगितले, ''पांडुरंगाची आज्ञा असेल तर मी

येईन." सासुरवाशीण कशी असावी हे सुचविले आहे. माहेर आहे ते पण आज्ञा आहे सासूची. त्यांची आज्ञा झाल्याशिवाय तीर्थयात्रा काय करायच्यात? म्हणजे सगळ्याही पुण्यपापापासून बाजूला झाले. व्यवहार संपलेला आहे. म्हणून त्यांना गुरुंच्यापासून ज्ञान व्हायला वेळ लागला नाही.

चांगदेवांना देहात्माभिमान हा स्पष्ट होता. मी १४०० वर्ष जगलोय. ज्ञानेश्वरमहाराज २२ वर्षांचे आहेत. पण नामदेवांच्या परीक्षेच्या वेळेला स्पष्ट केले . डोक्यावर सगळ्यांनी थापटल्यावर "मला मारु नका, मला मारु नका" हे कच्चं मडकं आहे असा सगळ्यांनी निर्णय दिला. तक्रार आली. पांडुरंगांच्याकडे, ते म्हणाले, हो बरोबर आहे त्यांचे सगळ्यांचे.

ते कसे काय? सगुण साक्षात्कार, तुम्ही माझ्याबरोबर बोलता, घरी येता, हे करता --- नामदेव म्हणाले.

पांडुरंग म्हणाले, बरोबर आहे. पण पूर्ण ज्ञान कुठे आहे तुला बाबा? ईश्वर इथे मंदिरातच आहे एवढेच तुला माहीत आहे.

नामदेवांचे प्रेम मोठे आहे पण ज्ञान नाही.

पांडुरंगांनी त्यांना विसोबा खेचरांकडे जाऊन यायला सांगितले. पण त्यांच्या भक्तीमुळे त्यांना ज्ञान व्हायला वेळ लागला नाही.

५३. दत्तमाहात्म्यात अलर्कांचे तसेच आहे ना, एकाच प्रश्नात त्याला ज्ञान झाले.

श्री– हो. कोण आहेत तूं? कोणाला दु:ख झाले? या शब्दांनीच त्याला शक्तीपात झाला. पुष्कळ जन्मांचे पुण्य असते. नामदेवांचेसुद्धा कांही अभंग आहेत वाटतं.

जन्मोजन्मी आम्ही बहु पुण्य केले
म्हणोनी पांडुरंगानी कृपा केली

हा अहंकार नाही. खरंच आहे ते.

५४. मी जर कोणाला सांगितले, मी पुण्याला गेलो, महाराजांचे दर्शन घेतले तर तो माझा अहंकार झाला कां? कर्ता कर्म क्रियापद वापरुन बोललो नाही तर एकमेकांशी संपर्कच साधता येणार नाही.

श्री– (दर्शनाला जाण्याची) बुद्धी देणारा ईश्वर आहे असे मानले म्हणजे झाले. एवढा विचार मनांत आला तरी पुष्कळ आहे. बुद्धीला प्रेरणा करणारी शक्ती वेगळी आहे एवढी जाणीव झाली पाहिजे. नाही तर आपलाच व्यवहार आहे, आपलंच कर्तृत्व आहे ही सवय होईल. तेवढे जपायचे. आणि तसं घडून येतं.

नरसी मेहताच्या मुलीचे लग्न पांडुरंगांनीच केलं असं ते म्हणत होते. काय प्रयत्न केला त्यांनी? पांडुरंगांनीच पुढाकार घेऊन ते लग्न केले. पण तितके आपले कर्तृत्व सुटलं पाहिजे. निदान प्रेरणा त्यांची आहे, मी केले नाही एवढे जरी आपल्याला वाटले तरी पुष्कळ आहे.

५५. अज्ञ जनांच्या नेमके लक्षांत येत नाही की जबाबदारी घ्यायची कोणती व सोडायची कोणती? त्याबद्दल आपली प्रवृत्ती कशी असावी?

श्री– जबाबदारी सोडायची नाही. करीत राहायचे. पण त्याबद्दल 'सुखदु:ख समेकृत्वा लाभालाभ जयाजयौ' हे जमले पाहिजे. प्रयत्न केल्यानंतर यश आले तर आले नाही तर नाही आले. उगीच निराश होऊन तरी काय करायचंय? मग ते कुटुंबीय असोत की आणखी इतर कोणी असोत. उगीच दु:खं करुन तरी काय करायचं?

५६. वास्तव स्वीकारणे पुष्कळ अवघड होऊन बसते. इतके दिवस मी हे करीत होते आत मी करु शकत नाही या शरीरांच्या मर्यादांची जाणीव होते.

श्री– शरीर थकल्यानंतर कांही होत नाहीच त्याला काय करणार? नुसते मनाने त्याचे दु:खं करुन तरी काय होणार? नाही होत तर करु नये. वृद्धावस्थेमध्ये जास्ती चिंता उत्पन्न होते म्हणतात ना आचार्य. याचं कसं होईल त्याचे कसे होईल. शरीराने तर कांही होत नाही. आणि शरीराने कांही होत असतांना तरी सर्व आपण आपल्या मनाप्रमाणे करु शकतो कां? त्यालाही पुष्कळ प्रतिबंध आहेत. प्रारब्ध आहे.

सगुण काय आणि निर्गुण काय दोन्ही एकच आहे. सगुणातूनच पुढे जायचंय. एकदम निर्गुणापर्यंत जाता येत नाही. त्याला मनाची तयारी लागते.

आत्मतत्त्व हे स्वयंप्रकाशी आहे. ज्ञानेश्वरीच्या आरंभी -- 'जय जय स्वसंवेद्या आत्मरुपा' असे म्हटले आहे ना ! अनुमान, वेद प्रमाण आणि स्वयंप्रमाण. 'ओम् नमोजी आद्या' म्हटल्यावर अनुमानानेही त्याचे ज्ञान होणारे आहे.

सगळ्याला आदी कार्य आहे. कार्यावरुन कारणाचे अनुमान करता येते. शब्दप्रमाण वेदप्रतिपाद्य आहे आणि शेवटी स्वसंवेद्य. वाणीच्याही पलीकडे स्वयंप्रकाश आहे.

५७. कुठलीही गोष्ट न ठरवता होत असते. ईश्वराच्या इच्छेने. सर्वसामान्य माणसाची. मग त्यांनी पुढचा विचारच करायचा नाही कां? मी स्वत: गोंधळात पडलो. सगळ्या गोष्टी ईश्वर करतो आहे. मान्य आहे.

श्री– नाही. मान्य आहे हे बोलण्यापुरते. खरोखर मान्य आहे कां? आम्ही व्यवहारात असं बोलतो. सर्व ईश्वर करणारा आहे. काही काळजी नाही. पण हे नुसतं बोलण्यापुरतं आहे. त्या मुलीप्रमाणे आपलीही मुलगी पराधीन आहे. ही कल्पना आहे कां? ही माझ्यावरच अवलंबून आहे. मी केलं पाहिजे. ही ही मुलगी आहे, ही ही मुलगी आहे. सहाय्यतेची अपेक्षा आहे. बुद्धी नाही. त्या बुद्धीनं करणं निराळं. ईश्वराची आहे ही. सहकुटुंब सहपरीवार । दास आम्ही हे घरदार । म्हणजे हा सर्व प्रपंच तुमचा आहे. मानून करायला हरकत नाही. ईश्वराच्या प्रपंच्यामध्ये आपण काहीतरी कार्यकर्ते आहोत. एवढे कर्तृत्व घ्यायलाच पाहिजे. ऑफिसमध्ये सांगितलेले काम केले म्हणजे कर्तृत्व घेतल्याशिवाय करता येईल कां? तो अधिकारी सांगेल तसं. ही तुमच्याकडे इतकी इतकी जबाबदारी आहे. प्रत्येकाला खुलासा कसा करता येईल? त्याने आपली दक्षता घेतली. प्रमोशन म्हणजे प्रशंसा नाही.

५८. काही वेळेला असं म्हटलं जातं आपण ठरवून काही होत

नसतं. ईश्वराने ठरवलं तसंच होतं. हे एकदा झालं, दोनदा, चारदा झालं तर मग आपण भविष्याबद्दल काही विचारच करायचा नाही कां? जे काय होईल ते होऊ दे. व्यावहारिक जीवनात घडणाऱ्या घटनांबद्दल.

श्री– तेवढी खात्री पाहिजे. आपल्याला तेवढी खात्री कुठे असते? काय होईल ते होईल, ईश्वर करेल. इतका पूर्ण विश्वास आहे का? हे केलं पाहिजे, ते केलं पाहिजे असं वाटतंच. ईश्वराला काही राग येण्यासारखं नाही. आम्ही कर्तृत्व घेतो. ईश्वर रागावला असेल. ईश्वरानेच आमची नेमणूक केलेली आहे. भरतानेही राज्य केलं. दुर्योधनानेही राज्य केलं. दोघांच्या मध्ये किती अंतर दिसतं. जमीन थोडी सुद्धा मिळणार नाही आणि भरत वाट पहात होता. चौदा वर्षे झाल्याबरोबर. भरत जिवंत रहाणार नाही. त्या हनुमानाला लौकर जा बाबा एकदा म्हणून पाठवलं. हे अंतर आहे. देवाचा संसार म्हणून आपण सर्वांची काळजी घेणं हे असत्य नाही. काय होईल ते होऊ दे म्हणून उपेक्षाही नाही. चांगलंच आहे. – असा उपदेश केलेला आहे. माझे गुरु आहेत, माझे आप्त इष्ट आहेत माझे भाऊबंद आहेत. मी त्यांना कशाला मारायचं, पाप लागेल मला. असा बुद्धीवाद केला म्हणजे सगळं कर्तृत्वं आपलंच समजलेला आहे तो. निमित्तमात्र तू आहेस. म्हणजे कर्तृत्व निमित्तमात्र का असेना आहे की ! जे प्राप्त झालेलं कर्तृत्व आहे ते करायचं. परोपकार सुद्धा फार कठीण आहे. किती परोपकार करणार तुम्ही, किती आदिवासी, सगळ्यांचं काय शक्यं आहे काय?

दया मनामध्ये ठेऊन समोर येतील त्यांचं करायचं.
करुणात्रिपदीमध्ये सुद्धा कितीतरी सिद्धांत कितीतरी भक्तीमार्ग त्यांनी दाखवून दिला.

*तव पदरी असता ताता । आडमार्गी पाऊल पडता ।*
*सांभाळूनी मार्गावरता । आणिता न दुजा त्राता ।*

हे किती सूचक आहे. कुणीतरी येऊन सांगतात. एक वकील आहेत. त्यांना इतके पैसे दिले की ते जज्जाला सांगून जागा खाली करुन देतील. मग लगेच त्याला पैसे दिले. पण रात्री त्याला जाऊन सांगितलं की पैसे जाऊ दे. आम्हांला करायचं नाही. हा मार्ग नाही. पुढे मग त्यांनी पैसे पाठवून दिले. आडमार्गी पाऊल पडता । सांभाळून मार्गावरता नेणारा त्राता आहे.
बदली होणार आहे. होईल. मृत्युची नुसती आठवण ठेवा म्हणून म्हणाले.

५९. आपण मनात आडाखे बांधत असतो, की अमुक एक करायचे. इथे तर असा विचार येतो की मी हे करतो तर ते ही चुकीचेच कां?

६० क्रियमाण कर्म संचिताने मिळालेली बुद्धि, ईश्वराने दिलेली बुद्धि आणि जीवाला स्वतंत्र दिलेली बुद्धि यापैकी आपल्या हातून घडणाऱ्या कर्माचा कार्यकारणभाव कोणाशी लावायचा? घडलेली एखादी गोष्ट जीवाच्या स्वतंत्र बुद्धिने घडली की बुद्धि कर्मानुसारिणी या न्यायाने पूर्व संचिताने घडली का ईश्वराने दिलेल्या प्रेरणेने घडली? काय समजायचे? आपल्या हातून होणाऱ्या सतत चुका, मनांत

उफाळून येणारे नको ते विचार याचा कार्य कारणभाव कोणाशी लावायचा?

श्री– ईश्वराला यामध्ये किती गोवायचे हा एक प्रश्न आहे. ईश्वर सर्वज्ञ आहे. पण तो तटस्थ आहे. आचार्य महाराज म्हणतात, पाऊस सगळीकडे पडतो. सुपीक जमिनीत चांगले बी असले म्हणजे पीक येते. त्यात पावसाचा कांही संबंध नाही. उपयोगी आहे. त्याच्या योगानेच सर्व होते पुन्हा.

६१ – मग आपल्या हातून घडणाऱ्या सर्व गोष्टी त्याच्या इच्छेनेच होतात का?

श्री – ''इच्छेने '' याचा अर्थ काय लावयचा हाच प्रश्न आहे. त्याच्या इच्छेने होतं म्हटलं तर जीवाला कांहीच कर्म स्वातंत्र्य नाही असा त्याचा अर्थ होतो. हे विधीनिषेध कशाला असं होईल.

६२ – मग त्याला पूर्वसुकृत म्हणायचं का? मग जीवाच्या स्वतंत्र बुद्धिचा वापर कधी केला जातो?

श्री – बुद्धि कर्मानुसारिणी असं जरी असलं तरी प्रत्यक्ष असा एक मोठा ज्ञानी पाहिजे ना ! कर्म कांही स्वत: बुद्धि देऊ शकत नाही. कर्म हे जड आहे. नोकरी चांगली करायची. पण ह्याने चांगली नोकरी केली हे जाणणारा वरचा अधिकारी आहे. त्याने ह्याचे काम जाणलं तर तो ह्याला प्रमोशन देतो. हा व्यवहार आहे ना! म्हणजे केवळ कर्म हे ग्राह्य मानता येत नाही. कर्माचा ज्ञाता कोण आहे? ईश्वर. सर्व बुद्धि साक्षी तो आहे ना ! त्यामुळे जीवाकडून होणाऱ्या

सर्व कर्मांचे ज्ञान त्याला आहे. कर्माप्रमाणे बुद्धि द्यायची प्रेरणा फक्त आहे त्याची. एवढाच त्याचा संबंध आहे. त्याने प्रत्यक्ष दिलेली बुद्धि कशी म्हणायची? सृष्टी निर्मिती करताना जीवांची कर्म सहाय्याला घेतलेली आहेत. जीवांची कर्म आहेत, काल आहे. हे सगळं घेऊन सृष्टी केलेली आहे.

श्री– मी एक नोकर आहे. माझा संसार आहे म्हणणे चुकीचे. देवाचा संसार आहे म्हणून करतो. भरताप्रमाणे संसार करायचा. दुर्योधनाप्रमाणे नाही. जास्ती कांही नाही. तुम्ही सत्य बोलला ना ! जास्ती आपला दोष आहे ही सारखी सवय लागणं हा ही दोष आहे.

६३. सत्संगात बुद्धीवर झालेला परिणाम सत्संग सोडून दुसरीकडे गेल्यावर टिकत कां नाही? सत्संगात येणारे चांगले विचार, चांगलं भाव टिकविला पाहिजे असे जीवाला वाटत असते पण तसं घडत नाही.

श्री– संसारात एकट्याचेच कर्म नसतं. संबंधी लोकांचीही कर्म असतात. आता ते संबंध सुटायचे म्हणजे कसे सुटणार? सगळे संस्कार असतातच की मनांत. इकडे लक्ष दिले पाहिजे तिकडे लक्ष दिले पाहिजे असे जे विचार असतात त्यांचं काय?

६४. पण संतांनी हे केलं की नाही? त्यांनी कांही करुन साधलं की नाही? आम्ही आपल्याला विचारायचं नाही तर कोणाला?

श्री– सर्वांगीण विचार करायचा.

६५. सर्वांगीण म्हणजे आपण सांगाल तो विचार आचरणात आणायचा. आता जर त्या चांगल्या वातावरणाचे विस्मरण होत असेल तर आमचे प्रारब्ध म्हणायचे कां?

श्री– संस्कार तसे असले पाहिजे. तन्मयता होणं याला तसे संस्कार लागतात. सगळ्यांचंच तसं होत नाही. पुष्कळ लोक येऊन गेले असतील. बरं झालं म्हणून म्हणतीलही. पण त्या वातावरणाचा आनंद टिकला पाहिजे असं सगळ्यांनाच वाटेल असं नाहीये.

६६. पण ज्यांना वाटतंय त्यांनी पुढे काय करायचे? ती भावना टिकावी म्हणून आम्ही कांही तरी प्रयत्न केला पाहिजे की नाही? तब्येत चांगली आहे, आपल्यासारख्यांचे मार्गदर्शन आहे तरी मग आम्ही तसंच राहायचं कां? आमच्याकडून प्रयत्न व्हायला पाहिजे हे निश्चित आहे पण तो प्रयत्न नेमका काय करायचा?

श्री– तळमळ वाटती आहे हे चांगलंच आहे. तळमळ वाटावी हे सांगितलेलच आहे. पण बाकीची सगळी कार्य संसारातली आहेत. ती काय लक्ष नसताना होतात असं म्हणायचं कां? का नको असं वाटून होतात असं म्हणायचं?

६७. त्याच्यातच अडकतो आम्ही.

श्री– कर्तव्यं जी आहेत. जे आपल्याबरोबर आलेले आहेत. कोणतेही संबंध असेनात. त्यांच्याबरोबर बोलणं, चालणं, मार्गदर्शन करणं, राग भरणं, प्रेमाने करणं, हे करावं लागतं. तर हे करताना ही वृत्ती (सत्संगात घालविलेल्या काळाचे स्मरण) कशी असणार? एक कांही तरी होईल. तळमळही

आहे आणि कर्तव्य कर्मही होताहेत अशी दोन्ही कामे एका वेळेला होतील कां?

६८. साधक श्रोता होत नाहीत.

श्री– मग ते व्हायला पाहिजे की नको?

६९. मग अकर्मक/अकर्तृत्व बद्धीने हे सगळे कसे करायचे?

श्री– अकर्तृत्व बुद्धी फार पुढं आहे. त्यांना सुद्धा प्रारब्ध आहे. आत्मज्ञान झाल्यानंतरसुद्धा प्रारब्ध राहातं. समाधीचा अभ्यासही त्यांचा असतो. केव्हांही समाधी लावून बसू शकतात. पण ती सुद्धा टिकत नाही. उत्थान होतं. सुषुप्तीसुद्धा जास्ती टिकत नाही ना ! सुषुप्ती आनंदच आहे. सुषुप्ती आत्मानंदच आहे. पण अज्ञानही त्यावेळेला........

श्रोता– पण मग हे व्यावहारिक जीवन असेच चालू राहाणार कां? मग ती स्थिती व हा व्यवहार याची सांगड कशी बसणार?

श्री – हा जो व्यवहार आहे याला कांही कारण आहे की नाही?

श्रोता– हो आहे.

श्री – जे कारण आहे ते समजून घेतलं की झालं. व्यवहार संपला पाहिजे असं कसं?

श्रोता– व्यवहार संपायला नकोच आहे, महाराज.

श्री – व्यवहार सोडून राहाण्याची आपली शक्ती आहे कां?

श्रोता– नाही.

श्री– लहान मुलगा चालायला शिकताना पडतो. पण एक ना एक दिवस आई वडिलांच्या मदतीशिवाय चालू शकतो. पण ही वेळ यायला वेळ लागतो. याला वाटतं नाही असं नाही पण असेल त्याप्रमाणे घ्यायचं, करायचं. अर्जुनाला

विश्वरुप पहायची इच्छा होती. दाखवा, म्हणून म्हणाला. ते रुप पहायची दिव्य चक्षु देऊन व्यवस्था करुन दिली भगवंतांनी. तुला या चक्षुंनी पहाता येणार नाही. आणि प्रत्यक्ष विश्वरुप दाखविल्यावर नको, नको म्हणाला. हे चतुर्भुज रुपच मला बरंय. इथं आता त्याचं कर्म म्हणायचं की ईश्वराची इच्छा म्हणायची? ईश्वराची इच्छा वगैरे कांही नाही. अर्जुनाने दाखवा सांगितले. हे, पहा, म्हणाले. तशी व्यवस्थाही करुन दिली ना. पण त्याला ज्ञान झालेलं आहे. पण तो विसरुन गेला. तेवढ्या पुरतां मोह गेला, कर्म केलं. ईश्वराची आज्ञा पालन केली, विजय मिळाला. पण पुढे पुन्हा म्हणाला, मला परत गीता सांगा. ते म्हणाले, मला सांगता येणार नाही. मी तुला त्या भावात सांगितली. त्यांनी आपलं हे करुन टाकलं. पण त्यांनी त्याला (न सांगता यायला) कारण दिलं. पुढं कृष्णांचा वियोग झाल्यावर अतिशय शोक झाला. म्हणजे भक्ती अंत:करणात इतकी मोठी होती, की जरी तो कृष्णांपासून दूर राहात होता; नेहमी कांही तो कृष्णांच्या सहवासात राहात नव्हता. हा हस्तिनापुरात राहायचा ते द्वारकेत असायचे. पण ती जी मनामध्ये सख्यभक्ती, प्रेमभक्ती होती की वियोग झाल्यावर अतिशय दु:ख झालं आणि त्या वेळेला ते ज्ञान प्रगट झालेलं आहे. म्हणजे ती तळमळ वगैरे आहे पण मधल्या काळात ते गेलं सगळं. त्यांनी कारणं तीन दिलीत. काल एक कारण दिलंय. दुसरं कर्म आणि तिसरं–अज्ञान. अज्ञानाचा प्रभाव असेपर्यंत कांही नाही.

३०

७०. अज्ञान नाहीसं कसं व्हायचं?

श्री– त्याकरता ईश्वराची भक्ती करायची. तीन कारणं त्यांनी दिलीत आणि एकदम शोक गेला त्याचा. ब्रह्मभाव त्याला त्या वेळेला मिळाला. तोपर्यंत कृष्णाचं चतुर्भुज रुपच बरं वाटलं. विश्वरुप दाखवायला सांगितलं आणि नंतर तोच नको म्हणाला. त्याचं कारण त्यांनी दिलंय –

*मया प्रसन्नेन तवार्जुनेन*

मी प्रसन्न झालो म्हणून तुला हे रुप दिसलं. ''प्रसन्न'' याचा अर्थ आचार्य महाराज प्रसाद, अनुग्रह. संकल्प असा करतात. ह्या भक्ताची इच्छा पूर्ण व्हावी. संकल्प शक्ती आहे ना ! त्यांच्या संकल्प शक्तीने अर्जुन प्रथम विश्वरुप पाहू शकला. पण तो नको म्हणाल्यावर ते रुप अदृष्य झालं. आग्रह नाही. म्हणजे ''काल'' हे एक कारण मानलं पाहिजे. त्याच वेळेला त्याला मुक्त करतां आलं नसतं कां? तूं जरी निघून गेलास तरी हे सगळे जाणार आहेत; असं इतकं जोराने सांगणारे त्याला मुक्त करु शकले नसते कां? पण नाही. कालाचा प्रतिबंध आहे. कालही एक कारण आहे. लोकांच्या पुढे ते आलं पाहिजे. ईश्वराची लीला आहेच आहे. अर्जुनाचा आदर्श पुढे ठेवायचा होता ना ! आणि तो वस्तुत: नराचाच अवतार होता. नर नारायण म्हणजे दोन असलेले एक किंवा एक असलेले दोन. मूळ रुपाने. पूर्ण ज्ञान संपन्न. अशा रुपानेही येतात. तसंही ज्ञान रुपाने समजायला हरकत नाही. आपण तरी निराळे कुठं आहोत? निराळेपणाचा जास्ती अध्यास आहे. तेच अज्ञान आहे.

त्यामुळे कमी होतंय जास्ती व्हायला पाहिज़े असे वाटते. तळमळ चांगली आहे. कांही हरकत नाही या दृष्टीने. तळमळ पाहिजे त्यानंतर प्रारब्ध सहन करण्याची शक्ती पाहिजे. आणखी सर्वत्र ईश्वरभावाचा अभ्यास केला पाहिजे. तीन कारणं आहेत. ब्रह्मदेवांच्या स्तुतीमध्ये आलेलं आहे. माझ्यावर देवाची कृपा केव्हां होईल अशी सारखी वाट पहावी. ती तळमळ पाहिजे. करावं लागतं आणिं करायचं सगळं. ती तळमळ अंत:करणात असेल हे मुख्य कारण आहे. आणि आपण केलेल्या कर्माचं फळ भोगलंच पाहिजे. ते एक आहे आणि सर्वांबरोबर प्रेमाने वागायचे. वेगळे वेगळे उत्पन्न होणारे विकार जाण्याकरता शास्त्रकारांनी पुष्कळ अभ्यास सांगितलाय पण अभ्यास तरी किती करणार? सगळी कारणं योगशास्त्रकारांनी सांगितली आहेत. दयाभाव उत्पन्न झाला तर क्रोधविकार मनातले जातात. पण दयाभावाचा अभ्यास करायचा म्हणजे कसा करायचा? ती माहिती कोणी तरी दिली पाहिजे ना ! दया करावी म्हणून कांही होऊ शकत नाही. पुष्कळ दु:ख पहातो आपण. द्रौपदीला त्या अश्वत्थ्याम्याची दया आली. ''त्याच्या आईला दु:ख देऊ नका'' म्हणाली. त्यामुळे धर्मराजसुद्धा संतुष्ट झाले. करत राहिलेली आहे. दु:शासनाला शासन झालं पाहिजे असंही म्हणत होती. पण शेवटी तिनं भक्ती जी केलेली आहे त्याचं एकदम फळ मिळालेलं आहे. अश्वत्थ्याम्याला सोडून द्यायला पाहिजे असाच तिने निर्णय दिला. सोडून द्यावं लागलं. आणि ते सगळं योग्यच आहे.

हा परिपाक ज्याला म्हणतात तो परिपाक आहे. म्हणजे लोणचं मुरावं लागतं ना ! स्वाद यायला वेळ लागतो. परिपाक कसा होतो, काय होतो आपल्याला कसं कळणार? मन, बुद्धी अतिंद्रिय आहे ना सगळं. इंद्रियच समजली नाहीत तर बुद्धी कुठं समजणार? विद्यारण्यांच्या प्रार्थनांत सगळा विषय आला आहे. आनंदरुप आहे, ज्ञानरुप आहे, सर्व व्यापक परमेश्वर आहे. सगळी संतांची, सत्पुरुषांची प्रार्थनाच आहे. प्रार्थना करत राहायचं, तळमळ ठेवायची. त्याचा परिपाक होत असतो.

७१. १६व्या अध्यायात ''गिळी ज्ञानाज्ञाना चांदणीया'' असा शब्द प्रयोग आहे. त्या शेवटच्या क्षणी अज्ञान राहांत नाही हे आपण समजू शकतो. पण ज्ञानही कसं राहात नाही?

श्री– ज्ञान ही सुद्धा एक वृत्तीच आहे. आणि गढूळ पाण्यामध्ये निवळीचे बी आपण टाकल्यानंतर त्यातली माती खाली राहाते आणि स्वच्छ पाणी वर येते तसे ज्ञान झाल्यावर अज्ञान हे तळाला जाते आणि ज्ञानंच फक्तं शिल्लक राहाते. पण ज्ञानसुद्धा कोणाला झालं? ज्ञान मला झालं ही सुद्धा भावना राहाता कामा नये. आणि म्हणून ती ज्ञानाच्याही पलीकडची अवस्था आहे. म्हणजे अंतिम अवस्थामध्ये ज्ञान मला झालं ही वृत्तीसुद्धा राहाता कामा नये. म्हणजे मी नाही.

७२. ज्ञानेश्वरीच्या ११व्या अध्यायात दुःख कालिंदीच्या तीरावर हा विश्व वृक्ष उभा आहे असे म्हटले आहे. याचा अर्थ हे जग दुःखं मूलक आहे असा होतो. मग हे ज्ञानेश्वरांच्या चित्

विलासवादाशी विसंगत नाही कां?

श्री– विश्वाची परिस्थिती सांगताना हे दु:खाचे वर्णन केले आहे. मुख्य उत्पत्ती जी ती मूल आनंदस्वरुपच आहे. आनंदापासून ती झाली आहे. पण जगाची उत्पत्ती होताना माया ही त्यात यावीच लागते. त्या मायेशिवाय उत्पत्ती होऊच शकत नाही. आणि माया आली की सत्व रज तम हे तिन्ही गुण येतात. आणि म्हणून दु:ख गेले. त्यामुळे यात विसंगती नाही.

७३. आजच्या काळात धर्मशास्त्राच्या, संतांच्या मार्गदर्शनाचा किती उपयोग आहे व आपला धार्मिक दृष्टीकोन काय असावा?

श्रींचे उत्तर – जीवनामध्ये ध्येय निश्चित करून त्याच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करणे प्रत्येक मानवाचे कर्तव्य आहे. मानव जन्म हा आत्मज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी आहे. ती प्राप्ती कशी करून घ्यायची याचे मार्गदर्शन संतांनी व शास्त्राने करून ठेवलेले आहे. आपण प्रथम मी कोण आहे. ईश्वर कोण आहे. हे जग काय आहे. ह्या जगाचा व माझा काय संबंध आहे. वगैरे अभ्यास संतांच्या, शास्त्राच्या मार्गदर्शनाप्रमाणे केला पाहिजे. आपल्याकडे जिज्ञासा असेल तर मार्ग सापडतो व तसे गुरू भेटतात. त्यांच्या उपदेशाप्रमाणे वागून आपले जीवन कृतार्थ करता येते. आजच्या आधुनिक वैज्ञानिक दृष्ट्या प्रगत जगात मानवाला खरे सुख व शांती फक्त भक्तीमार्गच देऊ शकतो. आजपर्यंत कोणतेही राज्य शासन बुद्धीतील विषमता दूर करू शकलेले नाही. साम्यवाद हा अनैसर्गिक असल्याने टिकू शकला नाही.

मनुसारख्या प्राचीन महर्षींनी खरा समाजवाद आम्हाला पूर्वीच सांगितला आहे. 'भूता परस्परे पडो मैत्र जीवांचे' ही आजच्या काळची गरज फक्त संतांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागले तरच पूर्ण हाऊ शकते. ही प्रार्थना संतांनी सतत ईशचरणी करून समाजामध्ये ऐक्य, सौहार्द भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला. बुद्धीचा विकास जास्तीत जास्त कसा साधता येईल या दृष्टीने आपण प्रयत्न केला पाहिजे. बुद्धी शुद्ध बनविण्यासाठी शास्त्रीय, संतांनी दाखविलेल्या मार्गाने आपण गेले पाहिजे.

७४. द्वैतातून बाहेर पडायचे असेल तर कर्मकांडाला एवढे महत्त्व कां दिले? कर्मकांडामुळे उलट बहिर्मुखताच वाढते.

श्री– कर्मकांड म्हणजे शास्त्राप्रमाणे स्नान संध्या, ईश्वराची पूजा वगैरे कर्मकांडात येते. व्यावहारिक गोष्टी आपण करतोच की. त्यावेळेला कां म्हणत नाही कशाला पाहिजे इतकं.... कर्म करण्याची शास्त्राची आज्ञा आहे व व्यवस्थित कर्म केलं तर मनाची एकाग्रता वाढत जाते. कर्मकांड निरुपयोगी नाही. लक्षपूर्वक केलं पाहिजे. आम्ही तसं करत नाही. अनेक व्याप असतात मागे आपल्या. आज ऑफिसात अमुक काम आहे, तिकडं जायचं आहे. हे विचार डोक्यात असल्यामुळे कर्मात लक्ष नीट लागत नाही. व्याप कमी होणं हे कठीण आहे. जसं होईल तसं करायचं. दुसरं काय करणार? व्यवहार कमी व्हायचा म्हणजे फार कठीण आहे. त्याकरता नामस्मरण चालू ठेवायचं. प्रार्थना करायची देवाची ''तुम्हीच करवून घ्या.'' बुद्धीला प्रेरणा करणारी शक्ती

आहे ती. त्या प्रार्थनेचा बुद्धीवर परीणाम होतो. त्याच्या कृपेनेच शांती मिळणार.

७५. क्ष – व्यावहारिक उन्नतीसाठी प्रयत्न केला तर साधना, जप, वगैरेंसाठी आवश्यक तो वेळ मिळत नाही. अशा परिस्थितीत नेमके काय करावे? तोच व्यावहारिक योग्यता वाढविण्यासाठी व्यवहार मान वाढविण्यासाठी वेळ द्यावा की नाही?

श्री – कोणत्या गोष्टीला किती वेळ द्यायचा हे दुसरा कसे व कोण ठरविणार? आपणच आपल्या परिस्थितीचा, गरजेचा विचार करून, त्याचप्रमाणे घरच्या वडीलधाऱ्या मंडळींचा, हितैषी मित्र मंडळींचा विचार घेऊन काय करायचं ते ठरवायचे. फक्त आपल्या एकट्याच्या बुद्धीने निर्णय घ्यायचा नाही. व्यवहार सोडून कसे चालेल? आपल्या मनाचा कल कुठे आहे ते बघून ठरवायचे. व्यवहार सोडून परमार्थ करीत बसलो आणि उद्या इतरांची भरभराट पाहिल्यावर जर आपल्या मनात आले की, आपण सुद्धा आपली अशी व्यावहारिक उन्नती साधली असती तर किती बरे झाले असते. असे जर का आपले मन उद्या बदलले तर? नुसती साधना करण्याचे आमचे प्रारब्ध आहे का? बाकीची सगळी व्यवस्था एकदा लागली की मग साधनेला हवा तेवढा वेळ देता येईल की. योग्यरित्या अर्थार्जन केल्यावर त्या द्रव्याचा पुण्यकर्म करण्याकरता विनियोग करता येतो. आपण प्रयत्न करीत रहायचे. सगळे कसे जमेल? परमार्थ आणि व्यवहार याची सांगड जेवढी घालता येईल तेवढी घालायची.

७६. दुःखं कां येतात?

श्री– दुःखं आलं असतांना जर परमेश्वराचे स्मरण घडत असेल तर ते दुःखं राहीलं तर काय हरकत आहे? दुःखात जर परमेश्वराचे प्रेम अधिक वाढत असेल तर दुःखं रहावं – नव्हे वाढावं. दुःखं जर ईश्वराकडे नेत असतील तर ती दुःखं द्यायला कारणीभूत असलेल्याबद्दल आदरभाव वाढवला पाहिजे.

७७. ठेविले अनंते तैसेची राहावे म्हणजे काय?

श्री– अनंताने ठेवले तसं राहावेच लागेल तुम्हाला. असा त्याचा अभिप्राय आहे. ''तुम्ही राहा'' असा नाही.

७८. श्रीकृष्ण एकीकडे उद्धरेत् आत्मानात्मानम् म्हणतात तर दुसरीकडे मी तुझा उद्धार करीन असेही म्हणतात. हे परस्पर विरोधी नाही कां?

श्री– संसारात आपल्याला अनेक लहान सहान दुःखं भोगावी लागतात त्यामुळे आपले चित्तं विचलित होते त्यातून तुला वाचवीन पण एरव्ही आत्मिक उन्नती तुझी तुलाच करुन घ्यायची आहे असे अर्जुनाला म्हणजे आपल्यालासुद्धा भगवान सांगताहेत.

७९. विषयांत सुख आहे कां?

श्री– ''विषयांपासून आपण सुखी होऊ'' ही समजूत गेली पाहिजे. दुःखं विसरण्यासाठी झोपेचे औषध देतात. म्हणजे झोपेत आनंद आहे. गाढ झोपेत असतांना कोणी आपल्याला उठवलं तर राग येतो, किती आनंदात होतो. कशाला उठवलं?

हा आनंद किंवा हे जे सुख आपल्याला झोपेत मिळतं त्या

वेळी, व्यवहारातली कोणती सुखाची साधने तिथे आहेत? धन नाही, सत्ता नाही, कांही नाही. शरीरही विसरुन गेला. ज्या इंद्रियांनी विषयांचं सुख भोगायचं ती इंद्रियेही (झोपेत असतांना) विलीन झालेली असतात. तेव्हां इंद्रियांचा संबंध नाही, मनही निर्विकार झालेलं आहे आणि एकही व्यावहारिक सुखाचं साधन तिथे नसताना हा आनंद कोणता? ते आत्म्याचे आनंदरुप आहे.

८०. दत्तमाहात्म्यात ओवी आहे --

मोक्ष नाही स्वर्गावरी । अथवा भूमीवरी ।
जो अहंकारा मारी । त्याच्या अंतरी मोक्ष वसे ॥

श्री- स्वर्गलोकाप्रमाणे मोक्ष हा कांही लोक नाही. मोक्ष इथंच आहे. देहादिकांपेक्षा मी वेगळा आहे हा साक्षीभाव मिळाला की संपलं. अविद्या जाणे म्हणजे मोक्ष आहे. अज्ञान असेपर्यंत अज्ञानाचे हे सगळे विकार असतात. कर्ता, भोक्ता, सुखी, दु:खी. माझे सुख गेले, मला दु:खं झाले वगैरे वाटते. मूळ स्वरुप असंग आहे, साक्षी, उदासीन आहे.

हंसराज स्वामींची वाक्यवृत्तीवर टीका मिळाली तर पहा तुम्ही. एखाद्या लायब्ररीत वगैरे मिळेल. हंसराज स्वामींनी शिवगीतेवरही टीका केली आहे.

पहिली वृत्ती जाऊन दुसरी वृत्ती यायच्या मधली स्थिती जी आहे ते शुद्ध आत्मस्वरुप आहे. हे अनुसंधान केलं की वृत्ती संपल्या. वृत्तींशी संबंध संपतो. वृत्तीशी एकरुप होऊन आपण वागतो ना ! मला सुख झालं दु:खं झालं.

८१. प्रारब्धच भोगायचे असेल तर कर्तृत्वाला वाव कुठे आहे?

प्रारब्धानुसार अमुक एक गोष्ट घडणारच आहे.

श्री– तसा कुठे निश्चय आहे आमचा? ठरलेलं आहे ही उगाच शंका मांडतो आपण. चर्चा करतो. पण जे ठरलेले आहे तसे होणार असा निश्चय असल्यावर कांही वाटत नाही. जप केला तर त्याकरता करायचा. शास्त्राने ईश्वराने सांगितलंय करा. प्रारब्धातही पुष्कळ प्रकार आहेत. ते प्रारब्धही कमी होऊ शकतं. ईश्वराच्या भक्तीनं.

*एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा ।*
*हरि कृपे त्याचा नाश आहे ॥*

हे त्यांनी सांगून ठेवलंय. तो नाश म्हणजे भोग भोगत असतानाही मनावर कांही परिणाम न होणं. प्रारब्धभोग जरी असला तरी आमच्या मनावर कांही परिणाम न होणं. घडून गेलं. ते कांही कायम राहाणार नाही. हाही नाशच आहे. पाप संपलं भोग भोगावा लागलाच नाही हाही नाशच आहे. असे प्रारब्धाचे अनेक प्रकार आहेत. ईश्वराचं अखंड स्मरण राहाणं महत्त्वाचं आहे. शास्त्रकार सांगतात त्या स्मरणामुळे सगळी विघ्न दूर होऊन खरा मी कोण आहे कळतं. सुख दुःख कोणाला आहेत. खरा मी त्यापासून बाजूला होतो. आनंद आहे. दुःखाचा कांही संबंध नाही. अज्ञान दूर व्हायला वेळ लागतो.

८२. आपण जे म्हणतो देव सगळं करतो ते अशा प्रसंगी कसे काय म्हणावे? अकाली मृत्यू आला म्हणून मी हा प्रश्न विचारत आहे. एखादा म्हातारा मनुष्य मृत्युमुखी पडला असता तर जगरहाटीप्रमाणे मृत्यु झाला असे समजून मी

हा प्रश्न विचारला नसता.

श्री– देव करतो म्हणजे तरी काय? देवावर वैषम्य वगैर कांही नाही असे म्हणतात. देव निर्दय नाही किंवा विषम वागत नाही असा सिद्धांत आहे. ब्रह्मसूत्रांत असे सांगितले आहे.

८३. देव निर्दय आहे असे मी म्हणत नाही. परंतु देव करतो ते आपल्या भल्याकरिताच सर्व करतो असे आपण समजतो.

श्री– आपल्या मनाच्या समाधानाकरिता हे विचार आहेत. संतांनी त्यासाठी हे विचार मांडले आहेत. त्याशिवाय समाधान कसे होणार ? काय झाले ? यावर देव सर्व करतो असेच संतांचे म्हणणे आहे. देव जे करतो ते स्वत:च्या इच्छेने करतो असे म्हटले तर ते विषम होईल. एकाला सुखी ठेवायचे, एकाला दु:खी ठेवायचे ही विषमता होईल. ही निर्दयताही आली. इच्छेप्रमाणे देव करीत असेल तर देव स्वत:च्या इच्छेने कांहीही करीत नाही. जीवाचे कर्म पाहून त्याप्रमाणे देव कार्य करीत असतो असे संतांनी सांगितले आहे. करण्याची शक्ती देवाची आहे. कर्माचे फळ देण्याची शक्ती आहे. ज्ञानेश्वरीतही हेच विचार सांगितलेले आहेत. ते तुम्ही वाचले असतीलच. त्यात नवीन काय आहे.

८४. मृत्युपूर्वी सतत हरिपाठ म्हटला व श्रीज्ञानेश्वर माऊलीचे नांव घेतले. तिने आईचे किंवा वडीलांचे नांव घेतले नाही. मग श्रीज्ञानेश्वर माऊलीने तिला प्रतिसाद कसा काय दिला नाही?

श्री– देहाच्या दृष्टीने हा विचार.

८५. म्हणजे काय?

श्री- जीवात्मा अमर आहे. त्याला मरण नाहीच आहे. श्रीज्ञानेश्वर माऊलीने तिला जवळ घेतली, कां नाही घेतली हे आत्ता आपण सांगू शकत नाही. या देहाशी ऋणानुबंध असेतोपर्यंत जीवात्म्याच्या त्या देहाशी संबंध राहाणार. आपल्यावर मोठा आघात झाला आहे हे खरे आहे. पण ऋणानुबंध होता तोपर्यंत देहाचा संबंध होता. आत्मा किंवा जीवात्मा अमर आहे.

८६. म्हणजे आपण कर्मविपाक सिद्धांत सांगता आहात काय?

श्री- कर्मविपाक सिद्धांत मानल्याशिवाय अशा घटना का घडतात याचे उत्तर देता येत नाही. ईश्वराला जर दोष द्यावा असे वाटत असेल तर ईश्वराला दोष देऊन तुम्हांला स्वस्थ रहाता आले पाहिजे. पण घटना होऊन गेल्यावर दोष देऊन तरी काय उपयोग. ईश्वराला दोष देऊन कांहीही उपयोग नाही. कर्मविपाक सिद्धांत मानावाच लागतो.

८७. कर्मविपाक म्हणजे काय ते जरा सांगता का?

श्री- आत्मा अमर आहे हे म्हटल्यानंतर कर्म आलीच. आत्मा अनादि आहे व अजरामर आहे. अनेक जन्म त्याचे होतात. जीवाचे जे अनेक जन्म होतात त्यापैकी हा एक जन्म आहे. असे जन्म मागेही झालेले आहेत व पुढेही होणार आहेत.

८८. चि. चे या जन्मीचे जे कर्म आहे त्याप्रमाणे तिला पुढचा जन्म मिळेल असेच ना?

श्री- तिचेच केवळ कर्म नव्हेच तर कुटुंबातील सर्वांचे कर्म ध्यानात घ्यावे लागते. परिवारातल्या लोकांचेही कर्म आहेच

की. इतका वियोग होणे व इतके असह्य दु:ख होणे हेही कर्मच मानले पाहिजे. अशा चांगल्या जीवात्म्याचा संबंध एकदम सुटणे हेही कर्मामुळेच झाले. कर्मविपाक सिद्धांताशिवाय याला दुसरे उत्तर नाही.

८९. ब्रह्म सत्य व जग मिथ्या आहे असे आद्यशंकराचार्यांनी सांगून ठेवले आहे. जग जर मिथ्या असेल तर मला पित्याचे व तिला आईचे एवढे दु:ख का व्हावे?

श्री– ब्रह्म सत्य जग मिथ्या हे नुसते शाब्दिक झाले. त्यांनी सांगितलेला सिद्धांत शाब्दिक मानून उपयोग नाही. जग हे मिथ्या आहे हे खरेच मानले तर दु:ख होणे शक्य नाही. जन्मापासून तिचा व तुमचा संबंध आहे. त्या संबंधाचे दु:ख होणे साहजिकच आहे. त्या संबंधाला मिथ्या कसे म्हणायचे? शास्त्राचे सिद्धांत व्यवहारापेक्षा वेगळे असतात. व्यवहारामध्ये समाधान करुन घेण्याच्या दृष्टीने हे म्हणायचं.

९०. एखाद्याच्या जीवनांत दु:खे व आघात यांची मालिका दिसते. हाही कर्मविपाकच कां?

श्री– जीवनांत नुसते दु:खं येत नसते. दु:खाबरोबर कांही सुखेही असतातच. सुखाचे स्मरण करुन दु:खाचे विस्मरण करायचे. दुसरे काय करणार? दु:खं कमी व्हायला वेळ लागणारच. साहजिकच आहे. काळ हे एकच औषध आहे. काळ गेल्याशिवाय दु:खं कमी होत नाही.

९१. महाराज सुखे व दु:खे ही एकाच कल्पनेची दोन रुपे आहेत असे म्हणायचे का?

श्री– आध्यात्मिक सुखे व दु:खे मानसिक आहेत. ती कांही

शारीरिक नाहीत. आपल्या शरीरात बिघाड काय झाला? तुमचे दु:खं मानसिक आहे. तुमच्या शरीरांत या मानसिक दु:खामुळे काय बिघाड झाला आहे? झोप लागते आहे. तहान लागते आहे. खाणेपिणे चालले आहे. नित्याचे शारीरिक व्यवहार चालूच आहेत. मनावर जो परिणाम झाला आहे तोच मानसिक सुखे व दु:खे देतो आहे. हा परिणाम साहजिकच आहे. आत्मियता एवढी दृढ झालेली असते की वियोगाचे दु:ख होतेच. उपयोग काय आता स्मरण करुन असा विचार केला पाहिजे. सत्य कटू असले तरी ते मानावेच लागते.

सात्विक जीवात्म्याला सुख हे लाभणारच. जीवनांत काय आणि मृत्युनंतर काय आपला संबंध संपला. त्याला कोण काय करणार?

कर्मविपाक सिद्धांत मानल्याशिवाय या घटनेचे स्पष्टीकरण करताच येणार नाही. आपला संबंध आहे तो संबंध कां आला व तो कां संपला?

१२. महाराज, परमेश्वर निर्गुण व निराकार आहे म्हणून त्याला एखाद्या व्यक्तीबद्दल प्रेम कृपा व माया नाही असे आपणांस म्हणायचे आहे का?

श्री– परमेश्वराला जर माया असती तर आमच्यांत व त्याच्यात काय फरक राहिला? परमेश्वर असंग आहे. आम्ही सर्व ठिकाणी संग ठेवून आहोत. मुलं, मुली आत्मिय लोक, मित्र त्यांच्याबद्दल आम्हाला ममत्व वाटते. परमेश्वराला असे कांही नाही. हे जे कांही झाले ते घटना ठरल्या आहेत त्याप्रमाणे

झाले. श्रीकृष्णांचे सर्व कुळ एका प्रहारामध्ये संपले. शोक मोह कांही नाही. श्रीकृष्ण असंग होते. तशी त्यांच्या मनाची ठेवण होती. ब्रह्मज्ञानी मनुष्य असंग असू शकतो. व्यासांनी धृतराष्ट्राला येऊन सांगितले होते. बारा वर्षांनी महायुद्ध होणार आहे. महायुद्ध आलं आहे. झालं त्याप्रमाणे.

९३. स्थितप्रज्ञ झाले तर सुखे व दु:खे उरत नाहीत असे म्हणायचे काय?

श्री– स्थितप्रज्ञ म्हणजे व्यावहारिक दृष्टीने देहाशी संबंध आपण ठेवला आहे. हे नामरुपात्मक प्रतीक आपल्याला दिसते आहे ते आपलं आहे. आपणही देहरुपच आहोत अशी समजूत आहे. त्यामुळे आपल्याला असे वाटते की देहाशी आपला संबंध रहावा. साहजिकच आहे ते. स्थितप्रज्ञ हा पारमार्थिक विचार आहे. त्याशिवाय काय करणार. एक जीवात्मा अजरामर आहे हा सिद्धांत म्हटल्यानंतर त्याचा एक देह गेला. असे कितीतरी देह आतापर्यंत गेले आहेत. तसाच हाही एक देह गेला. आम्हाला तो हवा होता हे बरोबर आहे. पण आमच्या इच्छेवर काहीही अवलंबून नाही. पण देह गेला असता तरी जीवात्मा निश्चितच आहे.

९४. ईश्वर करतो ते भल्याकरिताच करतो हा विचार बरोबर नाही काय?

श्री– तो विचार फार मोठा आहे. अनेक जन्माची कर्मे आहेत. कोणत्या कर्माचे हे फळ आहे हे कसे समजणार आपल्याला? आपल्या कोणत्या जन्मांतील कर्माचे हे भयंकर फळ मिळाले व हा आघात झाला हे समजून काय करायचे आहे.

स्वतःच्या हिताकडे ध्यान द्यायचे. दु:ख कशाने कमीकमी होईल त्याचे मार्ग कोणते आहेत इकडे ध्यान द्यायचे. हा प्रयत्न करायचा. त्या जीवाचा आपला संबंध संपला हा विचार केल्याशिवाय दु:खं कमी होणार नाही. एकत्र जन्मलेले जीवात्मे म्हणजे संसार आहे. अनेक कर्मफळे असलेले जीवात्मे एकत्र आले की संसार होतो. दुसरे काय कोणाचा संबंध लवकर संपतो. कोणाचा संबंध जास्तीवेळ टिकून रहातो. कर्म सिद्धांत मानावाच लागतो. जीवात्मा जन्ममरणरहीत आहे. देहाला जन्म आहे व मृत्यूही आहे. नवीन देहाचा जीवात्म्याशी संबंध येणे म्हणजे जन्म व देहाचा संबंध सुटणे म्हणजे मृत्यु. देह म्हणजेच आत्मा असे म्हणता येणार नाही.

९५. आमच्या मनाची समजूत या विचारांनी पटेल परंतु एका सामान्य स्त्रीने आई म्हणून आपली समजूत कशी काढावी?

श्री– हरिपाठ म्हणावा. एकनाथी भागवत वाचावे. संतचरित्रे वाचावीत. या जन्मात जे कांही चांगले करीत आहेत ते पुढील जन्मी उपयोगी पडणारच आहे. संतांची चरित्रे वाचून मनाला स्थिरता येते. हरीवरदा हे संपूर्ण कृष्ण चरित्र आहे ते वाचा. कोठेतरी मनाला गुंतवा. सारखे दु:ख करुन तरी उपयोग काय? कोठेतरी चांगल्या ठिकाणी मन गुंतवावे. मनाला बरे वाटेल. तेवढी विस्मृती होईल.

९६. एखाद्याची या जन्मात पापे नसतील पण पूर्व जन्मीची जी पापे असतात ती सद्‌गुरुंना शरण गेल्यामुळे नाहीशी होत नाहीत का?

श्री– चांगल्या सद्वर्तनाने बाकीचे दोष जातात ना. पूर्वजन्मीची पापेही जातात. धर्माने वागले म्हणजे पापे जातात. धर्माचरणाने पापनाश होतो. पण त्याची गणना करुन काय उपयोग? जे कांही हातून होऊन गेले ते धर्माचरणाने घडले असेल किंवा ईश्वरी कृपेने झाले असेल. त्याचे काय मोठे?

१७. प्राणायामामुळे मनाला स्थिरता होईल का?

श्री– ते आहेच. प्राणायाम चांगला असतो. तो चालूच ठेवावा. इतरांना धर्मविषयक मार्गदर्शन करण्याने सुद्धा मनाला स्थिरता येऊ शकते.

१८. आपले सद्वर्तन तसेच चालू ठेवायचे. श्रद्धा तशीच अढळ ठेवायची. आघात झाला म्हणून श्रद्धा डळमळता कामा नये. हे बरोबर आहे ना?

श्री– होय. हे बरोबरच आहे. आपल्या सद्वर्तनाने लोकांना सुखंच होते ना? आपल्या मनालाही सद्वर्तनाने समाधानच मिळते. आपण चांगले वागलो त्याचा दुसऱ्यावर काय परिणाम झाला याचा विचार करण्याचे कारण नाही. इतरांना धर्मविषयक मार्गदर्शन करावे. परोपकार करावा. दुसऱ्याची शारीरिक व मानसिक दु:खे दूर करणे हाही प्रयत्न सद्वर्तनच आहे. याचेही फळ आहेच की. नसायला काय झाले?

१९. गुरुंच्या कृपेने शांती मिळते ना. मग आम्ही दोघेही आपणाला शरण आलो आहोत. आम्हाला शांती द्या.

श्री– देवावर भार घालायचा. संसार देवाचा आहे. असं जर

पहिल्यापासून असलं तर कांही दु:ख होण्याचे कारण नाही. दुर्योधन सगळंच माझं आहे म्हणून शेवटपर्यंत धरुन बसला. भरताने हे माझे नाही आहे हे पहिल्यापासून मानले आणि सांभाळत बसला. मी घेणार असे भरत म्हणाला नाही. त्यामुळे चौदा वर्षे झाल्यावर भरत ते राज्य रामाला देऊ शकला. राज्य गेलं म्हणून भरताला वाईट वाटले नाही. म्हणून रामाला सुद्धां म्हणावं लागलं माझ्यापेक्षा तुझा त्याग मोठा आहे. मला राज्य मिळालेच नव्हतं. पण तुला तुझ्या आईनं राज्य मिळवून दिले असतांना तू तुला ते राज्य नको आहे असे म्हणालास. हा फरक आहे.

असे चांगले चांगले विचार वाचावेत व मनन करावे. त्याचा मनावर चांगला परिणाम होतो. असे विचार केले व संतांची चरित्रे वाचली तर श्रद्धा डळमळत नाही. या विचारांमुळे दु:खाच्या वेळी सुद्धा श्रद्धा अढळच राहील.

चांगले व वाईट प्रसंग सर्वांवरच येतात. असे अनेक जीव असतात. प्रसंग सर्वांवरच येतात. भीष्माचार्यांनी सर्व पांडवांना विचारले, तुम्हाला हे दु:ख कां भोगावे लागत आहे तुमच्या बाजूला काय कमी आहे. हा धर्मराज म्हणजे धर्ममूर्ती आहे. शेवटपर्यंत याने धर्म सोडला नाही. भीम म्हणजे शक्तीची मूर्ती आहे. अर्जुनाने शंकरापासून सर्व अस्त्रविद्या मिळविलेली आहे. आणखी सर्वात मोठी शक्ती म्हणजे तुमचा मित्र कृष्ण आहे. असे असतांना तुम्हाला दु:खे कां काय याचे उत्तर आहे? कर्मविपाक सिद्धांत मानावाच लागतो. अदृष्ट मानल्याशिवाय याचे उत्तर देता

येतच नाही. ते अदृष्ट काय आहे याचा विचार करुन काय करायचे आहे दुःखं झालं की गेलं. झालं गेलं सगळं संपलं. तुमचं तुम्ही चांगलं वागून रहा. भीष्माचार्यांनी सुद्धा शेवटी हेच सांगितलें.

१००. महाराज काही उपासना सांगा.

श्री– हरिपाठ चांगला आहे. धुंडामहाराजांनी त्याचा चांगला अर्थ सांगितला आहे. ज्ञानेश्वर महाराजांवर सुद्धा किती प्रसंग आले. ते घरात जाऊन दार लावून बसले. शेवटी मुक्ताबाईंनी त्यांना ताटीचे अभंग म्हणून बाहेर काढले. विसरुन गेले पाहिजे. तर जगाचे काम होते. नाहीतर नाही. स्वतः समाधानी असल्याशिवाय दुसऱ्याला काय सांगता येणार?

तुम्ही जर दुःख करीत बसलात की माझा अपमान झाला तर काय होईल. ताटी उघडा ज्ञानेश्वरा. असे अनेक प्रसंग आहेत. संतांची चरित्रे वाचावीत. पातंजल योगशास्त्रात सांगितले आहे. वीतराग विषय वा चित्तम, महात्मे, ब्रह्मज्ञानी त्यांच्या चरित्राचे चिंतन केले तरीसुद्धा चित्त स्थिर होते. म्हणून तो उपाय सांगितला आहे.

प्राणायाम हाही उपाय आहेच. पण ते सर्वांना साधता येतील असे नाही. सर्वसामान्य माणसाने श्रद्धेने संतांची चरित्रे वाचावीत.

एकनाथी भागवत वाचा. भावार्थ रामायण वाचावे. रामावर किती आघात झाले. पण ते धीरोदत्त महात्मा होते. ते सांगून आपण प्रयत्न करायचा. त्यांच्या चित्ताला सर्व

विसरायला वेळ लागणार. ममता आहे. पण कांही उपयोग आहे काय? तुम्ही ज्ञानेश्वरी वाचा.

१०१. स्वामी विवेकानंदानी असे म्हटले आहे की आपली पाच ज्ञानेंद्रिये जी बाहेर धावत असतात त्यांना आत आत्म्याकडे वळविणे व आत आत्म्याकडे स्थिर करणे हेच श्रेष्ठ ध्यान किंवा समाधी आहे. हे ध्यान मला कसे साधता येईल?

श्री– बाहेरच्या जगाची जाणीव संपली म्हणजे झाले. कारण इंद्रियांनी आत्मा जाणता येत नाही. अंतर्मुख अवस्था ही मनाची अवस्था आहे. इंद्रियांच्या द्वारानी मन बाहेर जाते. इंद्रिये थांबली की मन थांबले. त्या थांबलेल्या मनामध्ये केवळ आत्मस्वरुपाचाच विषय असणार. बाहेरचे विषय थांबले म्हणजे झाले.

१०२. पण त्यावेळी मनांत विचार येत रहातील काय?

श्री– जितके जितके विचार कमी होतील तितके मन आत्मस्वरुपाकार होईल. आपला साक्षी भाव असला की आत्मस्वरुपाचे अधिक अधिक ध्यान होईल.

१०३. म्हणजे साक्षी भावाचे ध्यानच श्रेष्ठ ध्यान आहे असे म्हणायचे कां?

श्री– होय. बाह्य विषयांचा संबंध सुटला की आत्मस्वरुपाशिवाय दुसरे कांही नाही.

१०४. पातंजल योगसूत्रांत सांगितलेली असंप्रज्ञात समाधी साक्षी भावाच्या ध्यानामुळे येऊ शकेल काय?

श्री– अभ्यास चालू ठेवावा.

१०५. ध्यानाच्या वेळी आत चैतन्य पहायचे व बाकीचे चोवीस

तास बाहेर चैतन्य सगळीकडे पहायचे अशी अवस्था चांगली काय?

श्री– व्यवहाराचेही बघावेच लागते ना. जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत । ही पुढची अवस्था आहे. बाहेरचा संबंध कमी कमी झाला की ती अवस्था प्राप्त होते.

एक पत्र आले आहे असा प्रश्न आहे की, कर्ता करविता ईश्वर आहे किंवा संतमहात्मेही ईश्वररुप आहेत. कर्तृत्वही मानायचे व पुन्हा ईश्वर अलिप्त आहे हेही मानायचे हे कसे काय? हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

ज्ञानेश्वर महाराज भिंतीवर बसले होते. भिंत चालली. भिंत चालली हे पहाणाऱ्यांनी म्हणायचे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांना त्याचे कांहीच भान नाही. भिंत चालली काय व न चालली काय. अहंकाराच्या पुढे श्रीज्ञानेश्वरमहाराज गेले होते. कर्तृत्वही मानायचे म्हणजे ते पहाणाऱ्यांनी मानायचे. वास्तविक ते अकर्तृत्व आहे.

१०६. मनातील अहंकार कसा घालवावा?

श्री– साधना चालू ठेवायची. ध्यान, प्राणायाम, उपासना यामुळे चित्ताची एकाग्रता होते. चित्ताची एकाग्रता झाली म्हणजे अहंकार कमी होतो. ध्यानाचा तो परिपाकच आहे. अहंकार म्हणजे देहादिकांच्या ठिकाणी अहंबुद्धी कमी होणे. दुसरे काय. अहंकार जायचा याचा अर्थ शुद्ध अहं रहाणे.

१०७. पातंजल योगसूत्रांत एक सूत्र असे आहे –

वीतरागविषयम् वा चित्तम

याचा अर्थ असा करता येईल कां की साक्षात्कारी संतांनी

आपल्या शिष्याचा विचार जर मनांत आणला तर त्या शिष्याचा आध्यात्मिक दृष्ट्या फायदा होईल.

श्री– हे बरोबर आहे. भक्ताने साक्षात्कारी संतांच्या चरित्राचे वाचन व मनन केले तर त्याचे चित्तं स्थिर होते. त्याचबरोबर जर गुरुंनी शिष्याचे चित्तं स्थिर व्हावे असा संकल्प केला तर त्यामुळेही शिष्याचे चित्तं स्थिर होईल. अर्जुनाला विश्वरुपदर्शन व्हावे असा संकल्प भगवान श्रीकृष्णांनी केला आणि तो संकल्प करताच अर्जुनाला विश्वरुपदर्शन झाले. भगवान श्रीकृष्णांनी संकल्प केला. त्यामुळे ते घडले.

१०८. शरणागत भावनेने एखाद्या भक्ताने आपल्यासारख्या साक्षात्कारी संतांची प्रार्थना केली तर त्या भक्ताचे चित्तं स्थिर होईल काय?

श्री– ईश्वरच साक्षात्कारी संतांच्या रुपाने कार्य करतो आहे. ईश्वराचे साह्य चालू आहे.

१०९. गुरु हा देहधारीच असला पाहिजे काय? कां ज्या गुरुने देह ठेवलेला आहे असा गुरुसुद्धा शिष्याला आध्यात्मिक मार्गदर्शन व साह्य करु शकेल?

श्री– सान्निध्य व संगती मिळालेली असली म्हणजे झाले. देह ठेवलेला असला म्हणून काय झाले. आपल्या मनांत सद्‌गुरुंबद्दल विचार आहेतच.

११०. ज्ञानेश्वर महाराज, गुळवणी महाराज हे आजही साह्य करतात काय?

श्री– होय. ते आजही साह्य करतात. ते ईश्वररुप झालेले आहेत. ते मुक्त झालेले आहेत. ईश्वरच त्यांच्या रुपाने कार्य करतो.

१११. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी गुरुच्या सेवेला खूपच महत्त्व दिलेले आहे. आम्ही गुरुंची सेवा कशी करायची? त्यांचे पाय दाबायचे कां त्यांच्या घरची कामे करायची? कां मनाने त्यांचे स्मरण व चिंतन करायचे कां शरणागत भावना ठेवायची?

श्री- सेवेचा अर्थ वासुदेवानंदस्वरस्वती स्वामी महाराजांनी सांगितला आहे. ते म्हणतात सेवा स्मृतिः । सद्गुरुंचे स्मरण रहाणे यालाच सेवा म्हणतात. पूजा म्हणजे भोज्य पदार्थ जे आहेत ते सद्गुरुंना निवेदन करणे. हे सर्व ईश्वराचे आहे. सद्गुरुचे आहे अशी भावना करणे. म्हणजे अहंकार कमी झालाच. त्याशिवाय होत नाही. यालाच खरी पूजा म्हणता येईल. गुरुंचे नामस्मरण करणे हीच गुरुची शिष्याने केलेली सेवा असे म्हणता येईल.

११२. हे विश्वचि माझे घर। ऐसी मति जयाची स्थिर । किंबहुना चराचर आपण जाहला । या ओवीचा नेमका अर्थ काय?

श्री- अहंकार म्हणजे संकुचित अहंकार नसून मोठा अहंकार आहे. एका घरातले किंवा आप्तसंबंधी तेवढेच माझे आहेत. माझ्याबरोबर अनुकूल वागणारे तेवढेच माझे आहेत असे वाटणे ही ममता हा दोष आहे. सर्व ठिकाणी ममता निर्माण होणे हे मोठे आहे. व्यापक झाला तो. त्याला आसक्ती म्हणता येत नाही. सर्वत्र ममता बुद्धी निर्माण होणे असं ते आहे. माझे म्हणणे ही ममता झाली. पण त्याचाही पुढे जाऊन 'सकलमिहम अहंच वासुदेवः' ही भूमिका येते. मीही गेलो. सर्वही गेले. त्या वासुदेवाशिवाय कांहीही उरले

नाही. 'इशावास्यम् इदं सर्वम् यत्किंच जगत्याम् जगत् '। ही शेवटची भूमिका आहे. म्हणजे व्यवहारांत कांही रागद्वेषाविक विकार रहात नाहीत. सकलमिदंच अहं वासुदेव: हीच भूमिका आहे.

११३. शारीरिक आसने, वज्रासन, पद्मासन वगैरे यामुळे चित्तं स्थिर व्हायला मदत होते काय? मनोभूमिकेवर त्या आसनांचा परिणाम होतो काय?

श्री– आसन हाही एक योगच आहे. त्यामुळे चित्तं स्थिर व्हायला मदत होऊ शकते. प्राणायामाच्यापूर्वी आसनबंध करतात.

११४. कर्मे इशू भजावा किंवा वाहुनी स्वकर्म कुसुमांची वीरा – ही ज्ञानेश्वरमहाराजांची शिकवण आम्ही आचरणांत कशी आणावी?

श्री– कर्तृत्व ईश्वराचे आहे – ही भावना दृढ झाली म्हणजे झाले. त्याचेच आहे सगळे. अहं कर्ता म्हटले म्हणजे झाले.
परि मनेवाचादेहे । जैसा जो व्यापार होवे ।
तो मी करीत आहे । ऐसे न म्हणे ॥ असे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

कर्तृत्व आपल्याकडे घेऊ नये अनुभवांवरुन, आपले स्वत:चे व लोकांचे व्यवहार पाहून कर्तृत्व वास्तविक आपले आहे कां ईश्वराचे आहे हे आपल्याला कळते. पुष्कळ प्रयत्नांनीही कांही वेळा कांहीही होत नाही. त्यामुळे कर्तृत्व ईश्वराचेच मानायला काय हरकत आहे. अशी बुद्धी झाली पाहिजे. कर्म ईश्वरार्पण करायचे म्हणजे कर्म ईश्वराला द्यायचे नाही. कर्तृत्व आपले नाही. ईश्वराचे आहे ही बुद्धी म्हणजे

कर्म ईश्वराला अर्पण करणे. हेच शुद्धं कर्म झाले.

११५. मृत्युनंतर आत्मा पुढे जातो. तो बुद्धी व मन बरोबर घेऊन जातो काय?

श्री– आत्मा जाणे येणे कांहीही नसते. सूक्ष्म शरीर जे आहे ज्ञानेंद्रिय, कर्मेंद्रिय, मन, बुद्धी; पंचप्राण हे सगळे कायम आहे. मृत्यु म्हणजे या भौतिक शरीराचा संबंध सुटणे. पण ते सूक्ष्म शरीर हे आत्म्याच्या बरोबर आहेच. म्हणून बुद्धी घेऊन तो जातो म्हणजे मनुष्य जन्मांत बुद्धीवर चांगले संस्कार करता आले तर तशीच पुढच्या जन्मांत बुद्धी मिळणार. पुन्हा तो आध्यात्मिक उन्नतीसाठी प्रयत्न करीत रहाणार. हा शास्त्रीय बुद्धीवाद आहे. बाकी कांही नाही. पुनर्जन्म नाही असे मानले तर कांही उत्तर देता येत नाही. एका व्यक्तीची बुद्धी इतकी कुशाग्र कां आणि दुसऱ्या व्यक्तीला कितीही शिकविले तरीही कळत कां नाही याचे उत्तर देता येत नाही. म्हणून हे आहे.

तो संस्कृत बुद्धी घेऊन आला आहे म्हणून त्याचा तसा अभ्यास चालू होतो. गजेंद्र आख्यानात हत्तीने ईश्वराची स्तुती केली असे सांगितले आहे. हे कांहीतरी आहे असे आम्ही म्हणणार नाही. पण हत्ती हा मागील जन्मांत भक्तं होता. त्यामुळे या जन्मी तो हत्ती असूनही त्याची ती बुद्धी कायम राहिली व त्याने ईश्वराची स्तुती केली हे या शास्त्रीय दृष्टीने उत्तर देता येते. नाहीतर बुद्धीवाद्यांच्या दृष्टीने ते सर्व प्रक्षिप्त आहे असे मानावे लागेल.

११६. आईनस्टाईनने असे म्हटले आहे की मनाच्या पलीकडे

गेले म्हणजेच खरे ज्ञान मिळू शकते. त्यालाही ईश्वरशक्ती मान्य आहे असे दिसते.

श्री– शास्त्रात असे म्हणतात की काहीतरी शक्ती आहे. अणु परमाणु इकडे तिकडे फिरत असतात. पण ते कां तसे फिरतात हे कोणी सांगू शकत नाही. त्यांचा चालक कोणीतरी मानावाच लागतो. ध्यानाचाच अभ्यास आहे तो. शास्त्रज्ञ अखंड चिंतन करतात म्हणूनच त्यांना शोध लागतात. नाहीतर शोध कसे लागणार? योगसिद्धीमध्ये हेच सांगितले आहे. जगातल्या कोणत्याही पदार्थाचे शाब्दिक ज्ञान संपादन करुन त्याचे जर ध्यान सुरु झाले तर त्या पदार्थाचे प्रत्यक्ष ज्ञान होते. 'त्रयमेकं संयमः' ध्यान धारणा व समाधी शास्त्रात असे संयम करतात. तसे शास्त्रज्ञ हे योगीच आहेत. शास्त्रज्ञांनी जे संशोधन करायचे ठरविले आहे त्यांनी जो संशोधन करण्याचा निश्चय केला आहे त्यामुळे त्यांचे मन बाहेर जातच नाही. गुरुत्वाकर्षणाचा शोध लावणारा शास्त्रज्ञ न्यूटन याने चहा करताना घड्याळ चहांत टाकले असे म्हणतात. इतका तो तन्मय झाला होता. त्याशिवाय शोध लागत नाहीत. शोध लावणे हा योगाचा अभ्यासच आहे. संबंध समजणे हळूहळूच यायचं, ही गोष्ट वेगळी. संपूर्ण ज्ञान हळूहळूच होते हे खरेच आहे. पण पूर्णता प्राप्त होणे वेगळे आहे. बुद्धीच्या पलीकडे काहीतरी आहे असे मानणे म्हणजे उपनिषदांतील ज्ञानच आहे.

*************